अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

दैनिक

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १९८ । शुक्रवार १ मे २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com




# शिर्डीजवळ हायटेक गर्भलिंग निदान केंद्राचा पर्दाफाश

## डॉक्टर, एजंटसह १० जणांना अटक

## पिंपरी निर्मळ शिवारातील निर्जनस्थळी पोलिसांचा छापा; २४ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी/राहता:** पवित्र तीर्थक्षेत्र शिर्डीच्या अगदी जवळ असलेल्या पिंपरी निर्मळ परिसरात, एका निर्जन शेतातील घरात सुरू असलेल्या बेकायदा गर्भलिंग निदान केंद्रावर पोलिसांनी धाडसी छापा टाकला. श्रीरामपूर विभागाचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली असून, यामध्ये एका डॉक्टरासह एजंट आणि ८ नातेवाईक अशा एकूण १० जणांना बेड्या ठोकण्यात आल्या आहेत. या कारवाईने अहमदनगर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



लोणी – पिंपरी निर्मळ रस्त्यालगत असलेल्या निळवंडे कालव्याच्या कडेला, वस्तीपासून दूर असलेल्या दोन खोल्यांमध्ये हे केंद्र चालवले जात होते. या केंद्रात प्रत्येक महिलेकडून १० हजार रुपये घेऊन गर्भलिंग निदान केले जात असल्याची गोपनीय माहिती पोलीस प्रशासनाला मिळाली होती. माहितीची खात्री करण्यासाठी पोलिसांनी एक बनावट महिला ग्राहक (डिकॉय) पाठवून सापळा रचला. तपासणी सुरू असल्याची खात्री पटताच, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केंद्रावर धाड टाकली.

या छाप्यात डॉ. राहुल आबासाहेब भनगे (वय ३४, रा. भानसहिवरे, ता. नेवासा) आणि एजंट अभिजीत दिलीप भुसाळ (वय ३०, रा. पिंपरी निर्मळ, ता. राहाता) यांना रंगेहाथ पकडण्यात आले.

डॉ. भनगे हे बीएएमएस असून, भुसाळ याने नर्सिंगचा कोर्स केलेला आहे. घटनास्थळावरून सोनोग्राफी मशीन, मॉनिटर, बॅटरी बॅकअप, जेल आणि वैद्यकीय कागदपत्रे असा एकूण २४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. यात तपासणीसाठी वापरल्या जाणाऱ्या ३ चारचाकी वाहनांचाही समावेश आहे.

तपासणीसाठी आलेल्या ८ महिलांची चौकशी केली असता, त्या बीड, संगमनेर, नाशिक, नांदगाव आणि पुणे या भागांतून आल्याचे निष्पन्न झाले.

या महिलांना मध्यस्थांमार्फत बाभळेश्वर येथे बोलावले जायचे आणि तेथून 'इटिंगा' व 'वॅगनर' सारख्या कारमधून गुप्तपणे या निर्जन केंद्रावर आणले जात असे. पोलिसांनी या सर्व महिलांची प्रवरा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करून त्यांना सोडून दिले, मात्र त्यांच्यासोबत आलेल्या पती व नातेवाईकांना अटक केली आहे.

> ■ अवैध गर्भलिंग निदान हा सामाजिक अपराध आहे. अशा केंद्रांवर आमची करडी नजर असून, भविष्यातही अशा प्रकारच्या कठोर कारवाया सुरूच राहतील.
>
> –सोमनाथ वाकचौरे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, श्रीरामपूर विभाग.

याप्रकरणी लोणी ग्रामीण रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. स्वाती पवार यांच्या फिर्यादीवरून लोणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध 'गर्भधारणापूर्व आणि प्रसुतीपूर्व निदान तंत्र लिंग निवड प्रतिबंधक कायदा १९९४' आणि 'महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टीशियन ॲक्ट १९६२' नुसार कारवाई करण्यात आली आहे.

अतिरिक्त पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे आणि लोणी पोलिसांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने ही मोहीम फत्ते केली.

## भाजपचा युवा चेहरा पुढे

# विवेक कोल्हे यांचा विधानपरिषद अर्ज दाखल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** भाजपाकडून विधानपरिषदेसाठी युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांना उमेदवारी देण्यात आली असून या पार्श्वभूमीवर विधानभवनात त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला.यावेळी उस्फूर्तपणे उपस्थित राहिलेल्या असंख्य कार्यकर्त्यांच्या जोशपूर्ण घोषणांमुळे विधानभवन परिसर दुमदुमून गेला होता.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमितभाई शहा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रभावी नेतृत्वात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री जयप्रकाश गोरे, मंत्री आशिष शेलार, संजीवनी उद्योग समूहाचे अध्यक्ष बिपीनदादा कोल्हे तसेच मा. आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या प्रमुख उपस्थितीत व मार्गदर्शनाखाली विवेकभैय्या कोल्हे यांनी भारतीय जनता पक्षाच्या वतीने उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल केला.

अर्ज दाखल केल्यानंतर कोपरगावसह नगर नाशिक नंदुरबार जळगाव धुळे यासह असंख्य ठिकाणी कोल्हे समर्थकांनी आनंदोत्सव साजरा केला. कार्यकर्त्यांनी विवेकभैय्या कोल्हे यांना खांद्यावर उचलून घोषणाबाजी केली. यावेळी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्यांनी कोल्हे यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. जिल्हाभरातून मोठ्या संख्येने समर्थक मंत्रालयात उपस्थित होते. भारतीय जनता पार्टीचा विजय असो,धन्यवाद धन्यवाद देवाभाऊ धन्यवाद,महाराष्ट्राचा लाडका भाऊ देवाभाऊ देवाभाऊ,विवेकभैय्या तुम आगे बढ़ो, हम तुम्हारे साथ है आणि भारत माता की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमला.

भाजप नेतृत्वाने विवेकभैय्या कोल्हे यांना विधान परिषदेत संधी देत त्यांच्यावर विश्वास व्यक्त केला आहे. सहकार,सामाजिक, युवा सक्षमीकरण क्षेत्रात कमी वयात नावलौकिक मिळवलेल्या, अभ्यासू आणि तडफदार नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या विवेक कोल्हे यांना या संधीमुळे जनसेवा अधिक व्यापक करण्याची संधी मिळणार आहे. या नेतृत्वाच्या माध्यमांतून प्रश्न मांडून विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. सरकारचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत घेऊन जाण्यासाठी पक्षाचा एक सैनिक म्हणून सर्वसामान्यांसाठी अहोरात्र काम करण्याचा आमचा मानस आहे. सहकाराच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून शासनाच्या माध्यमातून ज्या योजना असतील तसेच पक्षाच्या माध्यमातून सूचना असतील त्या आम्ही ग्रामीण भागात अंमलबजावणी करून ग्रामीण अर्थकारणाला सक्षम करण्याचे काम करणार आहोत. सहकार युवा सशक्तिकरण, संघटना हितासाठी आवश्यक तेथे पक्षाने दिलेल्या जबाबदारी प्रमाणे काम करणार असल्याचे कोल्हे यांनी स्पष्ट केले.

## महत्त्वाचे..

### आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना निकालासोबत उत्तरपत्रिकाही मिळणार!

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी (राज्य मंडळ) संलग्न शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांचा निकाल महाराष्ट्र दिनी शुक्रवारी (दि. १) जाहीर होत आहे. यंदा निकालादरम्यान विद्यार्थ्यांच्या निकालपत्राका सोबतच विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकाही पालकांना दाखविण्यात येणार आहेत.प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी आणि माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी याबाबत संयुक्त परिपत्रक काढत विभागीय शिक्षण उपसंचालक, प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी, शिक्षण निरीक्षक यांना सूचना दिल्या आहेत. राज्य मंडळाच्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांच्या उन्हाळी सुटीच्या कालावधीत एकवाक्यता आणि सुसंगती आणण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, राज्य मंडळाच्या सर्व शाळांना २ मेपासून उन्हाळी सुटी जाहीर केली आहे. त्यापूर्वी एक मे रोजी निकाल जाहीर केला जाणार आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०मध्ये नमूद केल्यानुसार, प्रत्येक विद्यार्थ्याच्या वैशिष्ट्यपूर्ण क्षमता शोधणे, ओळखणे आणि त्या विकसित करणे, शिक्षक आणि पालकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यास आणि अभ्यासेतर दोन्ही क्षेत्रामध्ये चालना देणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, निकालपत्रक देताना विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका पालकांना दाखविण्यात याव्यात.

### सुट्टीची सूचना

**सर्व वाचक आणि जाहिरातदारांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र दिनानिमित्त शुक्रवार, दि. १ मे २०२६ रोजी दै. राष्ट्रसह्याद्री कार्यालयास सुट्टी असेल. त्यामुळे शनिवार, दि. २ मे २०२६ रोजी अंक प्रकाशित होणार नाही. कृपया याची नोंद घ्यावी.**

**– संपादक**

# शनैश्वर देवस्थानच्या गाळ्यांचे टेंडर ६.६२ कोटींना

## पहिल्यांदाच पारदर्शक लिलाव प्रक्रियेला दाद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**सोनई :** जागतिक कीर्तीचे तीर्थक्षेत्र असलेल्या श्री शनैश्वर देवस्थानच्या व्यापारी संकुलातील पूजा साहित्य विक्री व इतर व्यवसायांसाठीच्या गाळ्यांची टेंडर प्रक्रिया नुकतीच पारदर्शक पद्धतीने पार पडली . एकूण ६० गाळ्यांसाठी ११ महिन्यांच्या कालावधीसाठी झालेल्या या निविदा प्रक्रियेत तब्बल ६ कोटी ६२ लाख ७६ हजार ४०९ रुपयांची बोली मंजूर करण्यात आली आहे.

ही संपूर्ण प्रक्रिया देवस्थानचे प्रशासक तथा नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. २८ एप्रिल रोजी कार्यकारी अधिकारी, लेखा अधिकारी, समिती सदस्य तसेच संबंधित विभाग प्रमुखांच्या उपस्थितीत सीलबंद निविदा सर्वांसमोर उघडण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने निविदाधारक उपस्थित होते. संपूर्ण प्रक्रिया खुल्या व पारदर्शक पद्धतीने पार पडल्यामुळे उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.

टेंडरमधील आकडेवारीनुसार, मूळ मंजूर रक्कम ५ कोटी ७२ लाख ९१ हजार ४४७ रुपये असून त्यावर जीएसटी ८९ लाख ८४ **(पान ४ वर)**

# जलयात्रेमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले : मुख्यमंत्री डॉ. यादव

## गोदा ते नर्मदा यात्रा महाराष्ट्रातील चौदा कोटी जनतेची : मंत्री बावनकुळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** 'पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे चरित्र अद्भुत आणि उज्वल होते म्हणूनच आपल्यासाठी आदर्शवत आहे. महाराष्ट्राच्या महापुरुषांनी देशाला दिशा दिली.त्यांचे सुशासन आणि जीवनकार्य अनेक शतकांपर्यत सर्वांना प्रेरणादायी ठरेल.त्यांच्या आशीवार्दानेच सरकारचे काम सुरू असून, गोदा ते नर्मदा यात्रमुळे मध्यप्रदेश आणि महाराष्ट्राचे नाते अधिक दृढ झाले असल्याचे भावोद्गार मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव यांनी काढले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या संकल्पनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जन्मभूमीतून आणि गोदा मातेचे उगमस्थान असलेल्या श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर मधून निघालेली गोदा ते नर्मदा जलयात्रा पाच दिवसांच्या प्रवासानंतर काल बुधवारी महेश्वर येथे पोहोचली. अतिशय भारलेल्या मंगलमय वातावरणात **(पान ४ वर)**



### चौदा कोटी जनतेची जलयात्रा

श्री. विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली गोदा ते नर्मदा जलयात्रेचे ऐतिहासिक आयोजन झाले, असे कौतुकोद्गार काढून श्री. बावनकुळे म्हणाले, ''मंत्रिमंडळाच्या बैठकीत श्री. विखे पाटील यांनी आम्हां सगळ्यांसमोर जलयात्रेची कल्पना मांडली, तेव्हा ती एवढी मोठी होईल, असे वाटले नव्हते. तथापि ही यात्रा व्यापक झाली, महाराष्ट्रातील १४ कोटी जनतेची ती आपली यात्रा बनली. या माध्यमातून पर्यावरण आणि जलसंधारण याबाबत मोठी जागरूकता निःसंशयपणे झाली.''संपूर्ण जग पाणीटंचाईच्या चिंतेने ग्रासले असताना आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जलसंस्कृती वर्धिष्णू करण्याबाबत बोलतात, विचार करतात. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव त्याच रांगेत येतात. त्यांनी आखलेल्या जलगंगा समर्थन यासह अन्य मोहिमा पाहिल्या तर त्यांना मध्य प्रदेशचे 'जलक्रांतिदूत' म्हटले पाहिजे, असे श्री बावनकुळे म्हणाले. अध्यात्म, लोककल्याण आणि संस्कृती यांचा पवित्र संगम म्हणजे अहिल्याबाई, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

अहिल्यानगरच्या भूमीवर
**आरोग्यसेवेचा नवा अध्याय सुरू...**

सस्नेह निमंत्रण!

**SHASHWAT**
MULTISPECIALITY HOSPITAL

अस्थिरोग | मेडिसिन | सर्जरी | किडनी विकार | स्त्रीरोग

## लोकार्पण सोहळा

**शुक्रवार**, दि. **१ मे २०२६** रोजी **सकाळी ११.००** वाजता

शुभहस्ते
**मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पा.**
जलसंपदा मंत्री, महाराष्ट्र राज्य व पालकमंत्री, अहिल्यानगर

अध्यक्ष
**मा.खा.श्री. सुजयदादा विखे पा.**
मा. सदस्य, नगर–दक्षिण लोकसभा मतदार संघ

अध्यक्ष
**मा.आ.श्री. संग्रामभैय्या जगताप**
आमदार, अहिल्यानगर विधानसभा मतदारसंघ

उपलब्ध डॉक्टर्स

**डॉ. दीपक दामोधर कळमकर** – अस्थिरोग तज्ज्ञ
**डॉ. प्रदीप रघुनाथ कंठाळी** – फिजिशियन
**डॉ. विश्वजीत प्रभाकर पवार** – जनरल सर्जन
**डॉ. आकाश बद्रीनाथ बेरड** – किडनी विकार तज्ज्ञ
**डॉ. योगिता दरेकर–पवार** – स्त्रीरोग तज्ज्ञ
**डॉ. अपूर्वा माटे–कळमकर** – स्त्रीरोग तज्ज्ञ
**डॉ. दामोधर लक्ष्मण कळमकर** – फिजिओथेरेपिस्ट (भारतीय वायुसेना)
**डॉ. तेजल सागडे–कंठाळी** – भुलतज्ज्ञ
**डॉ. प्रतिक्षा सोळंके–बेरड** – नेत्ररोग तज्ज्ञ
**डॉ. दीपक बाळासाहेब गाडेकर** – युरोलॉजिस्ट

**सविनय सप्रेम नमस्कार,**

उच्च दर्जाची, तज्ज्ञ व विश्वासार्ह वैद्यकीय सेवा समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाच्या प्रेरणेतून साकारलेले, शाश्वत सेवेचे व प्रेरणेचे द्योतक असे हे

**शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल**

आपल्या सेवेत लवकरच समर्पित होत आहे. आधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, सर्वसमावेशक वैद्यकीय सुविधा आणि रुग्णकेंद्रित सेवा या मूल्यांवर आधारित शाश्वत हॉस्पिटल हे आरोग्यसेवेचे नवे विश्वासस्थान ठरेल, असा आम्हाला दृढ विश्वास आहे.

या मंगलप्रसंगी आयोजित **लोकार्पण सोहळ्यास** आपली उपस्थिती लाभावी, **ही नम्र विनंती.**

आपली उपस्थिती हीच आमच्यासाठी सन्मानाची पोहोच पावती ठरेल.

– आपले विनीत –
**शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल परिवार**

स्थळ
नगर–मनमाड रोड, नाईक हॉस्पिटल जवळ,
**सावेडीगाव**, अहिल्यानगर ४१४ ००३.
संपर्क 0241-2427949 9867987698

JAHAGIRDAR 7499073130



# संपादकीय

## महाराष्ट्राची मान झुकवणारा 'अंधश्रद्धेचा नंगानाच'

महाराष्ट्राला संतांची आणि महान समाजसुधारकांची उज्ज्वल परंपरा लाभली आहे. महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संत गाडगेबाबा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी याच मातीत उभे राहून अंधश्रद्धेवर शब्दांचे आसूड ओढले. माणसाने 'विज्ञानाची' कास धरावी, ही त्यांची शिकवण होती. मात्र, आज त्याच पुरोगामी महाराष्ट्रात अध्यात्म आणि चमत्काराचा बुरखा पांघरून भोंदूगिरीचा जो नंगानाच सुरू आहे, ते पाहता राज्याची मान शरमेने खाली झुकते. अहिल्यानगरच्या संगमनेरमधील 'दत्तधाम सरकार' नावाचा आश्रम चालवणारा, मंत्राद्वारे कर्करोगासारखे दुर्धर आजार बरे करण्याचा दावा करणारा भोंदू राजेंद्र गडगे असो किंवा अन्य कुणी, हे प्रकार केवळ गुन्हेगारी नाहीत, तर ते आपल्या समाजाला लागलेली वैचारिक वाळवी आणि बौद्धिक दिवाळखोरीचे जिवंत प्रदर्शन आहे.

या भोंदूगिरीच्या बाजारपेठेत मालक कोण आहेत, हे पाहणे महत्त्वाचे आहे. दहावी नापास 'तोतया कॅप्टन' असो वा डी.एड. नापास आणि लासुर्णे येथे सुकट-बोंबिल विकणारा, या सगळ्यांच्या पार्श्वभूमीवर नजर टाकल्यास एक भीषण वास्तव समोर येते. आजच्या डिजिटल युगात जिथे माहितीची गंगा हाताच्या बोटावर उपलब्ध आहे, तिथे विज्ञानाच्या नावावर हे लोक 'चमत्कार' विकत आहेत. आपण याला दोष कुणाला द्यायचा? अशा बाबांच्या चरणी नतमस्तक होणाऱ्या भक्तांना, की ज्या समाजातून हे लोक येतात त्या समाजव्यवस्थेला? समस्या सुटावी म्हणून डोळ्यावर पट्टी बांधून अंधश्रद्धेच्या विहिरीत उडी मारणारा भक्तगण आणि त्या भक्तांच्या हतबलतेचा व्यापार करणारा भोंदू, हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जेव्हा एखादा माणूस व्याधीने जर्जर होतो, तेव्हा त्याची तर्कबुद्धी गहाण पडते. समाजातील याच भय आणि हतबलतेच्या अघोरी बाजारात या भोंदूंचे दुकान थाटले जाते. कर्करोगासारख्या जीवघेण्या आजारावर वैद्यकीय उपचार घेण्याऐवजी अंगारा-धुपारा करून तो बरा करण्याचा दावा करणे, हा केवळ कायदेशीर गुन्हा नाही, तर तो थंड डोक्याने केलेला नरसंहार आहे.


या भोंदूंच्या साम्राज्याला खतपाणी घालण्यात आपल्या राजकीय व्यवस्थेचा आणि 'सेलिब्रेटी' संस्कृतीचा मोठा वाटा आहे. पदांवर बसलेले लोकप्रतिनिधी जेव्हा अशा थोतांडी बाबांच्या चरणी नतमस्तक होतात, तेव्हा सामान्य जनतेच्या मनात त्यांच्याबद्दल एक 'आभासी विश्वास' निर्माण होतो. नेते आणि सेलिब्रिटींसोबतचे फोटो हे या भोंदूंच्या 'मार्केटिंग' करण्याचे सर्वात मोठे साधन बनतात. सत्तेची ऊब आणि राजकीय राजाश्रय मिळाल्यामुळेच या नराधमांची हिंमत वाढते. राजकीय वरदहस्त असल्यानेच या लोकांवर कारवाई करण्यास पोलीस प्रशासनही अनेकदा कचरते. आज समाजमाध्यमांचा (सोशल मीडिया) गैरवापर करून तरुण पिढीच्या डोक्यात धार्मिक गुंगी चढवण्याचे हे डिजिटल षडयंत्र अत्यंत भयंकर व चिंताजनक आहे. व्हॉट्सअॅप आणि फेसबुकच्या माध्यमातून चमत्कार सिद्ध करण्याचा दावा करणारे व्हिडिओ सर्वत्र पसरवून हे लोक विज्ञानाच्या विरोधात एक समांतर 'सत्य' उभे करत आहेत.

डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी आपल्या रक्ताचे पाणी करून, आयुष्याचा बळी देऊन महाराष्ट्रात 'जादूटोणाविरोधी कायदा' आणला. हा कायदा केवळ कागदावर राहण्यासाठी नव्हता, तर समाजातील अंधश्रद्धा आणि शोषणाविरुद्धचे ते एक शस्त्र होते. मात्र, आजही प्रशासकीय अनास्था आणि राजकीय दबावामुळे या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे होताना दिसत नाही. गडगे किंवा इतर भोंदूंच्या अटकेची बातमी वाचून आपण 'चला, कारवाई झाली' म्हणून मोकळे होतो, पण ही कारवाई केवळ वरवरची मलमपट्टी आहे. या भोंदूंच्या साम्राज्याचे आर्थिक धागेदोरे नेमके कोणापर्यंत पोहोचतात? त्यांना पडद्यामागून संरक्षण देणारे 'पांढरपेशी' सूत्रधार कोण? त्यांच्या मालमत्तेची आणि रॅकेटची पाळेमुळे खोलवर जाऊन शोधल्याशिवाय ही कीड मुळासकट संपणार नाही.

जोपर्यंत समाज 'चमत्कार' नावाची थोतांडी संकल्पना मुळापासून नाकारत नाही, तोपर्यंत दररोज नवा खरात, नवा गडगे किंवा नवा भोसले जन्माला येईलच. धर्म ही वैयक्तिक समाधानाची आणि मानसिक शांतीची बाब असू शकते, पण जेव्हा धर्माच्या नावाखाली लोकांच्या अब्रूशी, आरोग्याशी आणि पैशांशी खेळ होतो, तेव्हा तो समाजविघातक कर्करोग ठरतो. आज समाजात वैचारिक दिवाळखोरी इतकी वाढली आहे की, साधी आरोग्य समस्या आली तरी लोक डॉक्टरांकडे जाण्याऐवजी 'बाबा' शोधत आहेत. ही मानसिकता बदलल्याशिवाय केवळ कायद्याने किंवा पोलिसांच्या कारवाईने या गोष्टी थांबणार नाहीत.

आता वेळ आली आहे की, आपण भक्तीच्या नावाखाली चालणाऱ्या या संघटित लुटालुटीविरुद्ध आणि दहशतीविरुद्ध विवेकनिष्ठ बंड पुकारावे. भोंदूगिरीचा हा बाजार उद्ध्वस्त करण्यासाठी आता केवळ 'डोळस श्रद्धा' पुरेशी नाही, तर 'कठोर तर्क' आणि 'वैज्ञानिक दृष्टिकोना'ची तलवार परजणे हीच काळाची गरज आहे. आपण ज्या महाराष्ट्रात राहतो, तिथे विज्ञानाचा जयघोष व्हायला हवा. आपण जर आताच सावध झालो नाही, तर भविष्यातील पिढीला आपण एक अंधश्रद्धाळू आणि दिशाहीन समाज वारशाने देऊ. तेव्हा, उठा आणि या 'चमत्कारिक' फसवणुकीविरुद्ध आपली विवेकाची शक्ती एकवटून प्रतिकार करा. अंधश्रद्धेच्या या काळोखात विज्ञानाचा प्रकाश पेरणे, हीच आजच्या काळाची सर्वात मोठी 'राष्ट्रसेवा' आहे.

## देवळाली प्रवरा येथे ढोक महाराजांची श्रीराम कथा



**राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथे श्री साई प्रतिष्ठान व शहरवासीयांच्यावतीने वार्षिक श्री साई उत्सव तपपूर्ती व श्री साई मंदिराच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त भव्य श्री राम कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा धार्मिक सोहळा दि. ४ ते ११ मे २०२६ या कालावधीत बाजारतळ येथे पार पडणार असून, दररोज सायंकाळी ७.३० ते १०.३० या वेळेत कथा होणार आहे.

या कथामालेचे प्रमुख कथाकार म्हणून रामायणाचार्य रामरावजी महाराज ढोक (नागपूर) उपस्थित राहणार आहेत. कथामालेत श्रीराम जन्म, शिव-पार्वती विवाह, सीता स्वयंवर, केवट प्रसंग, भरत-राम भेट, लंका दहन आणि श्रीराम राज्याभिषेक असे विविध महत्त्वाचे प्रसंग उलगडले जाणार आहेत. मंगळवार ११ मे रोजी सायंकाळी मंडलिक महाराज यांचे काल्याचे कीर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री राम कथेचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजक श्री साई प्रतिष्ठान व देवळाली प्रवरा शहरवासीयांनी केले आहे.

## श्रीरामपूरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त स्पर्धांचा गौरव सोहळा उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** विश्ववंद्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त येथे रंगलहरी आर्ट गॅलरी, सक्षम फाउंडेशन आणि सिद्धार्थनगर युथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या उपक्रमातून बाबासाहेबांच्या क्रांतिकारी विचारांचा जागर करत तालुक्यातील सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले.

यावेळी निबंध, चित्रकला व वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांचा निकाल पुढीलप्रमाणे : निबंध स्पर्धा : प्रियांका चंद्रकांत शिंदे (प्रथम), ऋषिका किसन परदेशी (द्वितीय), गौरव गणेश कहाते (तृतीय). चित्रकला स्पर्धा : लहान गट : रोजबिन जावेद शेख (प्रथम), आशिष आनंद पुरोहित (द्वितीय), आर्यन संदीप गुंजाळ (तृतीय). मोठा गट : स्वाती गजानन घोरपडे (प्रथम), पूजा राजेंद्र नागरे (द्वितीय), अनिकेत संजय नन्नवरे (तृतीय). वक्तृत्व स्पर्धा : ओवी प्रसाद काळे (प्रथम), ऋषिका किशन परदेशी (द्वितीय), सलोनी जाधव (तृतीय). बक्षीस वितरण सोहळ्यास माजी उपनगराध्यक्ष संजय छल्लारे, नगरसेवक आशिष धनवटे, करण झंवर, सनी मंडलिक यांच्यासह विविध सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा संदेश जीवनात अंगीकारण्याचे आवाहन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रवी भागवत (रंगलहरी आर्ट गॅलरी), सक्षम फाउंडेशनचे सुशील पठारे, सोनू जामकर, संगीता बागुल तसेच सिद्धार्थनगर युथ फाउंडेशनचे अमोल मिसाळ, बाबा मिसाळ, आकाश पंडित व विशाल खंडागळे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी अशोक दिवे सर व राजेंद्र हिवाळे सर यांचे सहकार्य लाभले. भारतीय बौद्ध महासभेचे सुगंधराव इंगळे व लक्ष्मण म्हस्के यांनी लुंबिनी बुद्ध विहार उपलब्ध करून दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुशील पठारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अमोलकुमार मिसाळ यांनी केले. शहर व तालुक्यातील विद्यार्थी, तरुण आणि महिला वर्गाच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हा सोहळा सामाजिक सलोख्याचा उत्सव ठरला.



## युवकांनी विविध क्षेत्रात यश मिळवून गावचा नावलौकिक वाढवावा : मंजाबापू थोरात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** गावातील तरुण युवकांनी विविध क्षेत्रांमध्ये यश मिळवून गावचा नाववलौकिक वाढवावा असे उद्गार टाकळीभान सेवा संस्थेचे अध्यक्ष मंजाबापू थोरात यांनी काढले टाकळीभान सेवा संस्थेच्या वतीने विविध क्षेत्रातील निवडीबद्दल तसेच शासकीय सेवेत निवड झालेल्या युवकांचा सत्कार कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.



कार्यक्रम प्रसंगी टाकळीभान सेवा संस्थेच्या वतीने राष्ट्रवादी किसान सभेच्या उत्तर नगर जिल्हाध्यक्षपदी निवड झालेले प्रगतशील शेतकरी राजेंद्र कोकणे यांचा सत्कार करण्यात आला तसेच पुणे शहर पोलीस सेवेमध्ये निवड झालेले गावातील भूमिपुत्र दीपक ब्राह्मणे, राहुल औटी, पुणे लोहमार्ग पोलीस दलामध्ये निवड झालेले प्रमोद कलंके, अहिल्यानगर पोलीस दलामध्ये निवड झालेले सोपान बनकर यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी सेवा संस्थेचे माजी चेअरमन राहुल पटारे, शेतकरी संघटनेचे प्रभारी व प्रवक्ते प्रा. कार्लस साठे सर, माजी चेअरमन एकनाथ पटारे, व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, मा. व्हा. चेअरमन रोहिदास बोडखे, संचालक विजय कोकणे, शिवाजी पवार, अण्णासाहेब दाभाडे, बापूसाहेब शिंदे, भाऊसाहेब गव्हाणे, सोसायटीचे सचिव रामदास ब्राह्मणे, रघुनाथ शेळके, छोटू बनकर, रवींद्र शिरसाठ, संजय ब्राह्मणे, विजय नारळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी निवड झालेले पदाधिकारी राजेंद्र कोकणे व यशस्वी युवकांचे सेवा संस्थेच्या पदाधिकारी व ग्रामस्थ यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. सूत्रसंचालन व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे यांनी केले.तर आभार राहुल पटारे यांनी मानले.

## पोलिसात तक्रार केली म्हणून पती पत्नीला मारहाण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तुम्ही आमच्या विरुध्द तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला का गेले असे म्हणून आरोपींनी दोघां पती पत्नीला शिवीगाळ करुन कोयता व लाथा बूक्क्यांनी मारहाण केल्याची घटना राहुरी शहर हद्दीत दि. २७ एप्रिल रोजी सायंकाळच्या सुमारास घडली. सुषमा विलास वराळे, वय ४५ वर्षे, रा. नांदूर रोड, वराळे वस्ती, ता. राहुरी, यांनी राहुरी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे कि, सुषमा वराळे व त्यांचे पती विलास वराळे हे दि. २७ एप्रिल २०२६ रोजी ४.३० वाजेच्या सुमारास राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार देऊन घरी जात असताना बारागाव नांदूर रोड येथे आरोपी आले व म्हणाले कि, तुम्ही आमच्या विरुध्द तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनला का गेले. असे म्हणून आरोपींनी सुषमा वराळे व त्यांचे पती विलास वराळे यांना शिवीगाळ करुन सुषमा वराळे यांच्या तोंडावर थुंकले. तसेच कोयता व लाथा बूक्क्यांनी पती पत्नीला मारहाण केली. त्यानंतर आरोपी म्हणाला मी संध्याकाळी तुमच्या घरी येवून तुमचा एके एकाचा बेत पाहतो.सुषमा विलास वराळे यांच्या फिर्यादीवरून आरोपी सुभाष आप्पासाहेब वराळे, सुनिता सुभाष वराळे, कैलास आप्पासाहेब वराळे, वंदना कैलास वराळे, रा. नांदूर रोड, वराळे वस्ती, ता. राहुरी. तसेच पाच अनोळखी इसम अशा एकुण ९ जणांवर गुन्हा रजि. नं. ४२९/२०२६ भारतीय न्याय संहिता कलम ११५ (२), ११८ (१), १८९ (२), १९१ (२), १९१ (३), १९०, ३५१ (२), ३५२ प्रमाणे मारहाण व धमकी दिल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. पुढिल तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

## स्टेट बँकेच्या तीन एटीएम मशीनची माथेफिरूकडून तोडफोड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी:** राहुरी शहरात नगर-मनमाड रोडवर असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडियाच्या राहुरी शाखेच्या एटीएम सेंटरमध्ये काल गुरुवारी सकाळी सुमारे १० वाजेच्या सुमारास धक्कादायक तोडफोडीची घटना घडली. एका इसमाने अचानक एटीएममध्ये प्रवेश करून आत असलेल्या चारही मशिन्सवर दगडफेक करत मोठ्या प्रमाणात मशिनरीचे नुकसान केल्याची घटना घडली आहे.

या एटीएम सेंटरमध्ये दोन सीडीएम (कॅश डिपॉझिट मशिन) आणि दोन एटीएम मशिन्स कार्यरत आहेत. आरोपीने संतापाच्या भरात किंवा मानसिक असंतुलनामुळे मशिन्सवर दगड टाकत त्यांची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे एटीएममध्ये व्यवहारासाठी आलेल्या ग्राहकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

या घटनेची माहिती मिळताच उपस्थित नागरिकांनी तात्काळ बँक अधिकारी व सुरक्षा रक्षकांना कळविले. सुरक्षा रक्षकांनी तत्परता दाखवत संबंधित इसमाला घटनास्थळीच पकडून ठेवले. त्यानंतर राहुरी पोलिसांना याबाबत माहिती देण्यात आली.

सदरील घटनेची माहिती पोलिसांना मिळताच राहुरी पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले आणि आरोपीला ताब्यात घेतले. प्राथमिक अंदाजानुसार या तोडफोडीत लाखो रुपयांचे नुकसान झाले असून एटीएम सेवा काही काळासाठी विस्कळीत झाली आहे. त्यामुळे ग्राहकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.

दरम्यान, माथेफिरूने ही तोडफोड का केली याचा तपास पोलीस करत आहेत. बँकेच्या सीसीटीव्ही फुटेजची पाहणी सुरू असून त्यावरून अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे काल दुपारपर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती.



## एमबीबीएस पदवी प्राप्त केल्याबद्दल सौरभ चव्हाण यांचा मक्तापुर येथे गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील बर्हाणपुर येथील प्रगतशील शेतकरी विजयराव चव्हाण यांचे चिरंजीव डॉक्टर सौरभ विजय चव्हाण यांनी वैद्यकीय शिक्षणामध्ये एमबीबीएस ही पदवी प्राप्त केल्याबद्दल त्यांचे मक्तापूर येथील ग्रामस्थ व मराठा सुकानु समिती व गणेशभाऊ झगरे मित्र मंडळ यांच्या वतीने सन्मान करण्यात आला

डॉ. सौरभने अत्यंत गरीब परिस्थितीतून व मेहनतीने आपले शिक्षण पूर्ण केले घरची आर्थिक परिस्थिती हालाखीची असताना त्याने नेट परीक्षेत चांगले चांगले गुण मिळवून यश संपादन केले व जिद्द व चिकाटीने सर्वांना यशस्वी करून दाखवले, त्याबद्दल त्यांचे तालुक्यातील परिसरातून कौतुक होत आहे.

यावेळी झालेल्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी प्रगतशिल शेतकरी तुकाराम बर्डे,बाळासाहेब बर्डे,तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दत्ताभाऊ कांगुणे, मराठा सुकाणा समितीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष गणेश झगरे,पोलीस पाटील अनिल लहारे,शिवाजी बर्डे,कचरू जामदार,संभाजी बर्डे, अमोल जामदार, गणेश कांगुणे, मुख्याध्यापक दत्तात्रय कोळेकर, सौरव कांगुणे, युवा नेते मनोज झगरे, मच्छिंद्र पांडागळे, आजिनाथ सुभाष बर्डे, प्रदीप बर्डे आदी मक्तापूर ग्रामस्थ उपस्थित होते.



## गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान

वैशाख महिन्यातील पौर्णिमा हा दिवस भारतीय तसेच जागतिक सांस्कृतिक परंपरेत अत्यंत पवित्र, चिंतनशील आणि मूल्यप्रधान मानला जातो. याच दिवशी मानवजातीला करुणा, अहिंसा, समता आणि प्रज्ञेचा सार्वत्रिक संदेश देणाऱ्या गौतम बुद्ध यांचा जन्म, ज्ञानप्राप्ती आणि महापरिनिर्वाण हे तीनही महत्त्वपूर्ण प्रसंग घडल्याची परंपरा आहे. त्यामुळे हा दिवस केवळ धार्मिक विधींचा उत्सव नसून मानवी मूल्यांचे पुनरुज्जीवन करणारा, आत्मपरीक्षणाची प्रेरणा देणारा आणि सामाजिक परिवर्तनाला चालना देणारा एक महत्त्वपूर्ण पर्व ठरतो. आजच्या वेगवान, तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक जीवनशैलीत, जिथे माणूस भौतिक प्रगतीच्या मागे धावताना मानसिक शांतता, नैतिकता आणि सामाजिक समतेपासून दूर जात आहे, अशा परिस्थितीत गौतम बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान अधिकच सुसंगत आणि आवश्यक ठरते. गौतम बुद्धांचा जन्म इ.स.पूर्व सहाव्या शतकात लुंबिनी येथे शाक्यकुलात झाला. त्यांचे बालनाव सिद्धार्थ होते. राजघराण्यातील ऐश्वर्यपूर्ण वातावरणात त्यांचे बालपण गेले, परंतु त्यांच्या संवेदनशील मनाला जीवनातील दुःखाचे वास्तव सतत अस्वस्थ करत होते. वृद्धत्व, रोग आणि मृत्यू या अपरिहार्य सत्यांचे दर्शन झाल्यानंतर त्यांच्या मनात जीवनाच्या मूलभूत प्रश्नांची तीव्र जिज्ञासा निर्माण झाली. जीवन दुःखमय का आहे? आणि या दुःखातून मुक्तीचा मार्ग कोणता? या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी त्यांनी राजवैभवाचा त्याग करून संन्यासाचा मार्ग स्वीकारला. हा निर्णय केवळ वैयक्तिक नव्हता, तर संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी केलेली एक महान साधना होती. ज्ञानाच्या शोधात त्यांनी विविध गुरूंकडून शिक्षण घेतले, कठोर तपश्चर्या केली, परंतु त्यांना अपेक्षित समाधान मिळाले नाही. शेवटी त्यांनी अतिभोग आणि अतितप या दोन्ही टोकांच्या मार्गांचा त्याग करून 'मध्यम मार्ग' स्वीकारला. बोधीवृक्षाखाली गहन ध्यानसाधना करून त्यांना ज्ञानप्राप्ती झाली आणि ते 'बुद्ध' म्हणजेच 'जागृत' झाले. या ज्ञानप्राप्तीने त्यांनी मानवी जीवनाचे सत्य उलगडले आणि दुःखातून मुक्तीचा मार्ग दाखवला. बुद्धांचे तत्त्वज्ञान मूलतः मानवकेंद्रित आहे. त्यांनी कोणत्याही अलौकिक शक्तीवर अवलंबून राहण्याऐवजी मानवी अनुभव, विवेक आणि आचरण यांना महत्त्व दिले. त्यांच्या शिकवणीत मनुष्य स्वतःच्या कर्माचा निर्माता आहे आणि त्याच्या कृतींवरच त्याचे भवितव्य अवलंबून आहे, ही स्पष्ट भूमिका दिसते. हा दृष्टिकोन माणसाला स्वावलंबन, जबाबदारी आणि नैतिकतेची जाणीव करून देतो. गौतम बुद्धांनी मांडलेली 'चार आर्य सत्ये' ही त्यांच्या तत्त्वज्ञानाची मूलभूत आधाररचना आहे. जीवनात दुःख आहे, दुःखाचे कारण आहे, दुःखाचा अंत शक्य आहे आणि त्या अंताचा मार्ग आहेत ही चार सत्ये ती मानवी जीवनाचे वास्तव स्पष्ट करतात. बुद्धांनी दुःखाचे मूळ 'तृष्णा' किंवा अनियंत्रित इच्छांमध्ये पाहिले आहे. ही तृष्णा माणसाला सतत असमाधानी ठेवते आणि दुःखाचे कारण बनते. म्हणूनच तृष्णेवर नियंत्रण मिळवणे आणि मनाला संतुलित ठेवणे हे सुखी जीवनासाठी आवश्यक आहे. या दुःखातून मुक्त होण्यासाठी त्यांनी 'अष्टांगिक मार्ग' सांगितला आहे. सम्यक दृष्टी, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्म, सम्यक आजीविका, सम्यक प्रयत्न, सम्यक स्मृती आणि सम्यक समाधी या आठ घटकांचा समावेश असलेला हा मार्ग व्यक्तीला नैतिकता, मानसिक शुद्धता आणि प्रज्ञेच्या दिशेने नेतो. हा मार्ग केवळ आध्यात्मिक उन्नतीसाठी नसून तो दैनंदिन जीवनातही अत्यंत उपयुक्त आहे. या मार्गाचा अवलंब केल्यास व्यक्तीच्या विचारांमध्ये स्पष्टता, वर्तनात संतुलन आणि जीवनात समाधान निर्माण होते. बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान सामाजिक समतेवर आधारित आहे. त्यांनी जात-पात, वर्णभेद आणि सामाजिक विषमता यांचा ठामपणे विरोध केला. त्यांच्या मते, माणसाचे मूल्य त्याच्या जन्मावर नव्हे, तर त्याच्या कर्मावर अवलंबून असते. हा विचार त्या काळात अत्यंत क्रांतिकारी होता आणि आजही सामाजिक न्यायाच्या चळवळींना दिशा देतो. त्यांनी 'बहुजन हिताय, बहुजन सुखाय' हा मूलमंत्र दिला, जो सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्य करण्याची प्रेरणा देतो. स्त्री-पुरुष समानतेच्या दृष्टीनेही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांनी भिक्षुणी संघाची स्थापना करून स्त्रियांना धर्ममार्गावर समान स्थान दिले. त्या काळात स्त्रियांना धार्मिक आणि सामाजिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जात असताना बुद्धांनी त्यांना समानतेची संधी उपलब्ध करून दिली. हा निर्णय केवळ धार्मिकच नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा एक महत्त्वपूर्ण टप्पा होता. बुद्धांनी अहिंसा, करुणा, मैत्री, सत्य आणि क्षमा यांसारख्या मूल्यांचा प्रचार केला. त्यांच्या मते, खरा धर्म म्हणजे दुसऱ्याच्या दुःखाची जाणीव ठेवून त्याच्या कल्याणासाठी कार्य करणे. 'करुणा' हा त्यांच्या तत्त्वज्ञानाचा केंद्रबिंदू आहे. प्रत्येक जीवामध्ये समानतेने पाहणे आणि त्याच्याशी सहानुभूतीने वागणे हीच खरी मानवता आहे.आजच्या आधुनिक युगात माणूस भौतिक प्रगतीच्या शर्यतीत इतका गुंतला आहे की त्याने मानसिक शांतता आणि नैतिक मूल्ये गमावली आहेत. ताणतणाव, नैराश्य, असंतोष आणि स्पर्धा यामुळे मानवी जीवन अधिकच क्लिष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत बुद्धांचे 'मध्यम मार्ग' आणि 'संतुलित जीवन' यांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांनी सांगितलेला मार्ग संयम, सजगता आणि संतुलन यांचा आहे, जो व्यक्तीला अंतःशांती आणि समाधान देतो. पर्यावरणाच्या संदर्भातही बुद्धांचे विचार अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यांनी सर्व जीवांबद्दल करुणा आणि आदर बाळगण्याचा संदेश दिला. निसर्गाशी सुसंवाद राखून जगणे ही त्यांच्या शिकवणीची एक महत्त्वाची बाजू आहे. आजच्या पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन अत्यंत उपयुक्त ठरतो. बुद्धांचे मानवतावादी तत्त्वज्ञान केवळ वैयक्तिक जीवनापुरते मर्यादित नसून ते सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रालाही स्पर्श करणारे आहे. त्यांनी मानवी समाजातील अन्याय, विषमता आणि शोषण यांविरुद्ध एक सुस्पष्ट आणि विवेकी भूमिका मांडली. त्यांच्या विचारांत माणसाला केंद्रस्थानी ठेवून त्याच्या सन्मान, स्वातंत्र्य आणि समानतेचा आग्रह दिसतो. त्यामुळेच बुद्धांचे तत्त्वज्ञान हे केवळ धार्मिक चौकटीत न बसता व्यापक अर्थाने मानवतावादी आणि समाजपरिवर्तनवादी ठरते. त्यांच्या शिकवणीत कोणत्याही प्रकारच्या अंधश्रद्धेला, कर्मकांडाला किंवा रूढीपरंपरांना स्थान नाही. त्यांनी तर्क, विवेक आणि अनुभव यांच्या आधारे जीवन जगण्याचा संदेश दिला. आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या मूल्यांशीही बुद्धांचे विचार अत्यंत सुसंगत आहेत. स्वातंत्र्य, समता आणि बंधुता ही लोकशाहीची मूलतत्त्वे त्यांच्या तत्त्वज्ञानात स्पष्टपणे दिसून येतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी मिळावी, तिच्या सन्मानाचे रक्षण व्हावे आणि ती स्वाभिमानाने जगू शकेल अशी व्यवस्था निर्माण व्हावी, हा त्यांच्या विचारांचा गाभा आहे. आजच्या काळात वाढती सामाजिक दरी, आर्थिक विषमता आणि अन्यायाच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर बुद्धांचे विचार समाजाला अधिक न्याय्य आणि सुसंवादी बनवण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. शिक्षणाच्या क्षेत्रातही बुद्धांचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी ज्ञानाला केवळ माहितीपुरते मर्यादित न ठेवता त्याचा उपयोग जीवन समजून घेण्यासाठी आणि आत्मविकासासाठी करावा, असा संदेश दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची, विचार करण्याची आणि सत्याचा शोध घेण्याची प्रेरणा दिली. स्वतःच्या अनुभवातून सत्य जाणून घ्या ही त्यांची भूमिका आजच्या वैज्ञानिक आणि तर्कशुद्ध दृष्टिकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. शिक्षण हे केवळ रोजगार मिळवण्यासाठी नसून ते व्यक्तिमत्त्व विकासासाठी आणि समाजाच्या उन्नतीसाठी असावे, ही त्यांची शिकवण आजही तितकीच महत्त्वाची आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान मानसिक आरोग्याच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त आहे. आजच्या युगात तणाव, नैराश्य, चिंता आणि अस्थिरता या समस्या वाढताना दिसतात. अशा परिस्थितीत 'सम्यक स्मृती' आणि 'सम्यक समाधी' या संकल्पना अत्यंत प्रभावी ठरतात. सजगता (माइंडफुलनेस) आणि ध्यानसाधना यामुळे मन शांत होते, विचार स्पष्ट होतात आणि व्यक्तीला आत्मिक समाधान मिळते. त्मानवी विकास आणि पर्यावरण यांच्यात संतुलन राखण्याची गरज त्यांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान जागतिक स्तरावरही प्रभावी ठरले आहे. आशियातील अनेक देशांनी त्यांच्या शिकवणीचा स्वीकार करून आपली सामाजिक आणि सांस्कृतिक व्यवस्था घडवली आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या सर्व मूल्यांना प्रोत्साहन देते. त्यांनी द्वेषाऐवजी मैत्री, हिंसेऐवजी अहिंसा आणि स्वार्थाऐवजी परोपकार यांचा पुरस्कार केला. त्यामुळेच त्यांच्या विचारांमुळे जागतिक शांतता आणि सौहार्द निर्माण होण्यास मदत होऊ शकते. गौतम बुद्धांचे जीवन आणि तत्त्वज्ञान हे केवळ भूतकाळातील एक ऐतिहासिक घटना नसून ते आजच्या आणि भविष्यातील समाजासाठीही मार्गदर्शक आहे. त्यांच्या शिकवणीतून आपण केवळ वैयक्तिक जीवनातील समस्या सोडवू शकत नाही, तर समाजातील व्यापक प्रश्नांनाही सामोरे जाऊ शकतो. त्यांनी दिलेला 'मध्यम मार्ग' हा अतिरेक टाळून संतुलित जीवन जगण्याचा मार्ग आहे, जो आजच्या युगात अत्यंत आवश्यक आहे. वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने आपण बुद्धांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते आपल्या जीवनात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. करुणा, समता, प्रज्ञा आणि अहिंसा या मूल्यांचा अंगीकार केल्यास आपण अधिक शांत, सुसंवादी आणि न्याय्य समाज निर्माण करू शकतो. समाजातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनात आणि विचारांमध्ये सकारात्मक बदल घडवून आणल्यासच खऱ्या अर्थाने बुद्धांचे तत्त्वज्ञान साकार होईल. आजच्या पिढीसमोर अनेक आव्हाने आहेत. स्पर्धा, ताण, नैतिक अधःपतन, सामाजिक विषमता आणि पर्यावरणीय संकट. या सर्व समस्यांवर मात करण्यासाठी केवळ बाह्य उपाय पुरेसे नाहीत, तर अंतर्मुख होऊन स्वतःच्या विचारांमध्ये आणि वर्तनात बदल घडवणे आवश्यक आहे. बुद्धांचे तत्त्वज्ञान या परिवर्तनासाठी एक प्रभावी मार्ग दाखवते. त्यांच्या शिकवणीतून आपण संयम, सजगता, सहानुभूती आणि विवेक या गुणांचा विकास करू शकतो. शेवटी असे म्हणता येईल की गौतम बुद्ध यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान हे संपूर्ण मानवजातीसाठी एक अमूल्य वारसा आहे. त्यांच्या विचारांची सार्वत्रिकता, साधेपणा आणि उपयुक्तता यामुळे ते काळाच्या कसोटीवर टिकून राहिले आहेत. वैशाख पौर्णिमेच्या या पवित्र दिवशी आपण त्यांच्या विचारांचा पुनर्विचार करून आपल्या जीवनात आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडवण्याचा संकल्प करूया. करुणा, प्रज्ञा आणि समतेच्या या मार्गावर चालत आपण अधिक सुंदर, शांततापूर्ण आणि न्याय्य जग निर्माण करू शकतो हीच या दिनाची खरी शिकवण आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
(लेखक, समाजशास्त्र, पाली आणि बौद्ध धम्माचे अभ्यासक )

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

दखल

## माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयास सायकल स्थानक भेट

**श्रीरामपूर** : रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालयाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त इयत्ता दहावीच्या १९८३ च्या माजी विद्यार्थ्यांकडून विद्यालयास सायकल स्थानक देणगी मिळाले आहे. प्रवरानगर येथील महात्मा गांधी विद्यालयाचे अमृत महोत्सवी वर्ष असल्याने या विद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. या उपक्रमांपैकी नियोजित ६ लाख ५५ हजार रुपये किमतीच्या सायकल स्थानकाच्या उभारण्याची जबाबदारी इयत्ता दहावीच्या १९८३ च्या माजी विद्यार्थ्यांनी स्वीकारली आहे. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या १९८३ च्या माजी विद्यार्थ्यांच्या बैठकीचे आयोजन नुकतेच करण्यात आली होते. या बैठकीत सर्वांनी एकत्रित निधी संकलन करून विद्यालयास सायकल स्थानक देणगी देण्याचे निश्चित केले.

## VSI चे शिष्टमंडळ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर

**संगमनेर** : महाराष्ट्रातील ऊस शेती व साखर उद्योगासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या आंतरराष्ट्रीय अभ्यासदौऱ्यासाठी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट (VSI) चे शिष्टमंडळ २६ एप्रिल ते ८ मेदरम्यान ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. या दौऱ्यात शिष्टमंडळ शुगर रिसर्च ऑस्ट्रेलिया (SR-) या अग्रगण्य ऊस संशोधन संस्थेला भेट देणार आहे. या प्रतिनिधी मंडळात ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, माजी मंत्री राजेश टोपे यांच्यासह नामांकित शास्त्रज्ञांचा समावेश आहे. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित ऊस वाण, साखर उतारा वाढविण्याच्या पद्धती तसेच संशोधन सहकार्याच्या संधींचा अभ्यास हा या दौऱ्याचा मुख्य उद्देश आहे.दौऱ्यात स्पीड ब्रीडिंग, हवामान बदलास प्रतिकार करणाऱ्या जातींचा विकास, कीड व रोग व्यवस्थापन आणि मिलिंग-प्रोसेसिंग तंत्रज्ञानावर सखोल चर्चा होणार आहे. तसेच तडख व डठ यांच्यात सामंजस्य करार (चेण) होण्याची शक्यता असून, त्यातून संयुक्त संशोधन, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि शास्त्रज्ञांचे प्रशिक्षण यांना चालना मिळणार आहे.या सहकार्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अधिक उत्पादनक्षम व रोगप्रतिकारक ऊस जाती उपलब्ध होण्याची अपेक्षा असून, साखर उद्योगाच्या स्पर्धात्मक क्षमतेत वाढ होणार आहे. जागतिक ज्ञान; स्थानिक विकास या संकल्पनेला बळ देणारा हा दौरा ठरणार असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# चिमुकल्यांची विज्ञान सफर

## आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : तालुक्यातील खडांबे खुर्द येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत Infosys स्प्रिंगगार्ड (मेकर लॅब व्हील) उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना विज्ञान व तंत्रज्ञानाचा अनोखा अनुभव देण्यात आला. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण होऊन कुतूहल, आत्मविश्वास आणि शिकण्याची आवड वाढल्याचे दिसून आले.



'अंधश्रद्धेला नाही थारा, विज्ञानाची कास धरा' या घोषवाक्यानुसार विद्यार्थ्यांनी स्वतः प्रयोग करत विविध संकल्पना समजून घेतल्या. ऊर्जा रूपांतरण, टॅब हाताळणी, 3D प्रिंटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (I) यांसारख्या विषयांचा प्रत्यक्ष अनुभव देण्यात आला. विद्यार्थ्यांनी मनातील प्रश्न निःसंकोचपणे विचारत विज्ञानाची गोडी आत्मसात केली.

या उपक्रमासाठी लेखाधिकारी रमेश कासार यांचे मार्गदर्शन लाभले. मोबाईल प्रयोगशाळेच्या माध्यमातून शाळेतच आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झाल्याने अवघड संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून सांगण्यात आल्या. पालक व शिक्षकांनी हा उपक्रम स्तुत्य, उपयुक्त व प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणारा हा उपक्रम त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचा टप्पा ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.या उपक्रमासाठी तुंबारे, कार्ले मॅडम, बोरुडे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळा व्यवस्थापन समिती, माजी विद्यार्थी संघ तसेच ग्रामस्थांनीही सहकार्य केले.दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पारे यांनी विज्ञानवादी दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन करत भोंदूगिरीपासून दूर राहण्याचा संदेश दिला.

## साई आदर्श मल्टीस्टेटच्या कर्जदारास शिक्षा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : धनादेश न वटल्याच्या प्रकरणात राहुरी येथील साई आदर्श मल्टीस्टेट संस्थेच्या दोन कर्जदारांना न्यायालयाने शिक्षा सुनावली आहे. या प्रकरणामुळे पतसंस्थेला दिलासा मिळाला असून थकबाकीदारांमध्ये खळबळ उडाली आहे.

राहुरी खुर्द येथील संतोष भाऊसाहेब वाघमारे तसेच दाढ बु. (ता. राहाता) येथील संदीप रावसाहेब चव्हाण यांनी संस्थेकडून कर्ज घेतले होते. मात्र मुदतीत परतफेड न केल्याने कर्ज थकीत झाले. वसुलीदरम्यान दोघांनीही धनादेश देऊन रक्कम अदा करण्याची हमी दिली; परंतु संबंधित धनादेश बँकेत वटले नाहीत.

याप्रकरणी संस्थेच्या वतीने न्यायालयात नि.से. क्ट कलम १३८ अंतर्गत दावा दाखल करण्यात आला. सुनावणीदरम्यान साक्षीदारांची साक्ष व सादर कागदपत्रे ग्राह्य धरत न्यायालयाने निर्णय दिला.

न्यायालयाने संतोष भाऊसाहेब वाघमारे यांना ९५ हजार रुपये नुकसानभरपाई, तर संदीप रावसाहेब चव्हाण यांना ४० हजार रुपये नुकसानभरपाई भरण्याचे आदेश दिले आहेत. ही रक्कम निर्धारित मुदतीत न भरल्यास प्रत्येकी एक महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

हा निकाल प्र.तु. शेजवळ काळे यांनी दिला. फिर्यादीतर्फे ड. अक्षय शेळके यांनी काम पाहिले. या निर्णयामुळे पतसंस्थेच्या वसुली प्रक्रियेला बळ मिळणार असल्याचे सांगण्यात आले.

## पुणतांब्यात अधिकारी राहत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : येथील विविध शासकीय विभागांतील अधिकारी नोकरीच्या ठिकाणी राहत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. ग्रामसेवक, तलाठी, मंडळ अधिकारी, वीज वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता, कृषी सहाय्यक आदी अधिकारी बाहेरगावाहून ये-जा करत असल्यामुळे ते वेळेवर कार्यालयात उपस्थित राहत नाहीत. परिणामी नागरिकांना आवश्यक कामांसाठी त्यांची वेळेवर भेट होत नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर ग्रामसभेत याबाबत ठोस निर्णय घेण्यात यावा, अशी मागणी मनसेच्या शेतकरी सेनेचे तालुका अध्यक्ष संदीप वहाडणे यांनी केली आहे. विशेषतः महसूल विभागाच्या कामकाजाबाबत ग्रामस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष असल्याचे त्यांनी नमूद केले.दरम्यान, गोदावरी नदीपात्रातून मोठ्या प्रमाणावर बेकायदा वाळू, मुरूम व इतर गौण खनिजांचा उपसा सुरू असून, संबंधित यंत्रणेकडून त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. या अवैध उत्खननामुळे भविष्यात पाणीटंचाई अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.तसेच, परिसरात विविध प्रकारचे अवैध व्यवसायही वाढत असल्याचे चित्र असून, त्यावर नियंत्रण ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. अधिकारी गावात राहत नसल्यामुळे त्यांच्यावर कोणताही वचक राहिलेला नाही, अशीही टीका व्यक्त होत आहे.या सर्व प्रश्नांवर ग्रामसभेत सविस्तर चर्चा करून ठोस निर्णय घेण्यासाठी आपण आग्रह धरणार असल्याचे वहाडणे यांनी स्पष्ट केले.

## विवेक कोल्हेंच्या नावाची विधानपरिषदेसाठी घोषणा होताच कोपरगावात दिवाळी



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : युवानेते विवेक कोल्हे यांना राज्याच्या विधान परिषदेसाठी भाजपाकडून उमेदवारी जाहीर असून या ऐतिहासिक निवडीबद्दल कोपरगाव मतदारसंघात विविध ठिकाणी मोठा जल्लोष साजरा करण्यात आला. भाजपाच्या पक्षश्रेष्ठींनी युवा नेते विवेकभैय्या कोल्हे तसेच कोल्हे कुटुंबाच्या निष्ठेची दखल घेतली असून विवेक कोल्हे यांना विधान परिषदेची उमेदवारी दिल्याने योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत आहे. विवेकभैय्या कोल्हेंसारख्या युवा व अभ्यासू नेतृत्वाला विधान परिषदेवर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे सर्वत्र आनंद व्यक्त होत असून या नव्या समीकरणामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री तथा सहकार मंत्री अमित शहा आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,व कोअर कमिटी यांनी कोल्हे कुटुंबावर मोठा विश्वास दाखवत विधानपरिषदेची उमेदवारी युवा नेते विवेकभैय्या कोल्हे यांना दिली आहे. दोन वर्षांपूर्वी कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षश्रेष्ठींनी विवेकभैय्या कोल्हे यांना दिल्लीला बोलावून महायुतीसाठी निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेत त्यांच्या पुढील राजकीय भवितव्यासाठी ठाम पाठीशी उभे राहण्याचे संकेत दिले होते.यावेळी भाजपाच्या मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली युवानेते विवेक कोल्हे यांनी देशाचे सहकार मंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच भाजपाच्या पक्षश्रेष्ठींच्या भूमिकेचा आदर करून २०२४ ची विधानसभा निवडणूक न लढवण्याचा निर्णय घेतला होता. निवडणूक न लढवूनही त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या उन्नतीसाठी सातत्याने पुढाकार घेत पक्षासाठी उल्लेखनीय कामगिरी केली. तीन महिन्यांपूर्वी पार पडलेल्या कोपरगाव नगरपालिकेच्या निवडणुकीत दैदीप्यमान यश संपादन करत त्यांनी आपल्या नेतृत्वाची छाप संपूर्ण महाराष्ट्रात उमटवली आहे. तसेच भारतीय जनता पार्टीच्या उन्नतीसाठी मेहनत घेतली.विवेक कोल्हे यांना विधानपरिषदेवर नियुक्त केल्यामुळे कोपरगाव मतदार संघामध्ये आनंदाची लाट पसरलेली आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण कोपरगाव तालुक्यात तसेच मतदारसंघातील विविध भागांमध्ये भाजप कार्यकर्त्यांनी फटाके फोडून, मिठाई वाटून जल्लोष साजरा केला. अनेक ठिकाणी फ्लेक्स झळकले दिवाळीप्रमाणे आनंदोत्सव साजरा होत असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## आत्मा मालिक बाल संस्कार शिबिरास प्रारंभ

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव** : संगीत, कला, क्रिडा आणि संस्कार यांचा सुरेख मेळ साधणा-या आत्मा मालिक बाल संस्कार शिबीरास उत्साहात प्रारंभ झाला. कोकमठाण येथील आत्मा मालिक शैक्षणीक संकुलात आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरात विविध जिल्ह्यातील एक हजाराहून अधिक मुले सहभागी झाले आहेत. चाळीसहून अधिक शिक्षक आणि प्रशिक्षक या शिबीरात कार्यरत आहेत.



पहाटे ५ च्या सुमारास योगा प्राणायाम आणि सुर्यनमस्काराने या शिबीरार्थींच्या दिवसास प्रारंभ होतो. तासभराच्या या व्यायामानंतर साडेसात वाजता आयोजित परिपाठात बोधकथा आणि देशभक्तांच्या कार्याची माहिती दिली जाते. किर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते मार्गदर्शन करतात. त्यानंतर दिड तासाच्या कौशल्य विकास तासिकेत अभिनय, संगीत, योगासने, वारकरी भजने यापासून क्रिकेट सह अन्य मैदानी खेळापर्यंतचे प्रशिक्षण दिले जाते. दुपारी साडे चार ते साडे सहा या कालावधित मैदानी खेळ खेळले जातात. त्यात कब्बडी, खोखो आणि व्हालीबॉल आदि खेळांचा समावेश आहे. सायंकाळी साडे सात च्या सुमारास भोजन आणि त्यानंतर मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात.

याबाबत माहिती देताना विश्वात्मक जंगली महाराज आश्रमाचे अध्यक्ष नंदकुमार सुर्यवंशी म्हणाले, राज्यभरातील विद्यार्थ्यांचा सहभाग हे या शिबीराचे वैशिष्ट आहे. एकदा शिबीराला आलेली मुले पुढील वर्षी आपल्या मित्रांना घेऊन या शिबीरात सहभागी होतात. कला, क्रिडा, संगीत, अभिनय आणि संस्कार या पंचसुत्रीला प्राधान्य दिले जाते. सुजाण नागरीक घडविण्याच्या दृष्टीने अशी शिबीरे उपयुक्त ठरतात.संस्थेचे उपाध्यक्ष बाळासाहेब गोर्डे, सरचिटणीस हनुमंत भोंगळे, विश्वस्त प्रदिप भंडारी व प्रकाश गिरमे यांनी शिबीरास भेट देऊन शिबीरार्थी सोबत संवाद साधला. प्राचार्य सुधाकर मलिक, साईनाथ वर्पे, मिराताई पटेल, आत्मदर्शन बागडे, प्राचार्य निरंजन डांगे व प्राचार्य माणिक जाधव शिबीर यशस्वी व्हावे यासाठी परिश्रम घेत आहेत.

## विवेक कोल्हेंची उमेदवारी जाहीर होताच पुणतांबा परिसरात जल्लोष



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा** : युवा नेते विवेक कोल्हे यांना भारतीय जनता पक्षामार्फत महाराष्ट्रातील विधान परिषद जागेसाठी पक्षामार्फत अधिकृत उमेदवारी जाहिर होताच पुणतांब्यासह ११ गावात कोल्हे समर्थकांनी फटाक्याची आतषबाजी करत तसेच गुलाल उधळत आनंदाने जल्लोष साजरा केला.

काही निष्ठावान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करून देशाचे गृहमंत्री अमित शहा व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेला शब्द पाळला व विवेक कोल्हेंना न्याय दिला. अशी भावना व्यक्त केली पुणतांबा येथील ग्रामपंचायत कार्यालयासमोर माजी सरपंच सुधाकर जाधव डॉ. अविनाश चव्हाण, दादा पाटील सांबारे, केशवराव जाधव, बाळासाहेब जाधव, संदीप गुंजाळ, संदीप चव्हाण, रमेश चव्हाण, गंगाधर झगडेसह अनेक कार्यकत्यांनी फटाक्यांची आतषबाजी करत आनंद उत्सव साजरा केला.

## नेवासा तालुक्यात खतांची कृत्रिम टंचाई? पण कागदोपत्री साठा भरपूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : तालुक्यात सध्या रासायनिक खतांची कृत्रिम टंचाई निर्माण झाल्याचे चित्र असून, कागदोपत्री मोठ्या प्रमाणात खतसाठा दाखवला जात असताना प्रत्यक्षात मात्र शेतकऱ्यांना खत मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. उन्हाळ्याच्या काळातच खतांचा तुटवडा भासू लागल्याने येणाऱ्या खरिप हंगामात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होण्याची भीती व्यक्त होत आहे.

नेवासा तालुक्यातील अनेक खत विक्री केंद्रांवर साठा संपला खत शिल्लक नाही असे ग्राहकांना सांगितले जाते. मात्र दुसरीकडे प्रशासनाच्या नोंदीत खत उपलब्ध असल्याचे दाखवले जात असल्याने नेमके खत जातेय कुठे? असा प्रश्न उपस्थित होत आहे. काही ठिकाणी काळाबाजार, साठेबाजी आणि अधिकाऱ्यांच्या संगनमताचा संशयही व्यक्त केला जात आहे.याच पार्श्वभूमीवर सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ पटारे यांनी आक्रमक भूमिका घेत प्रशासनावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी थेट प्रश्न उपस्थित करत म्हटले आहे कागदोपत्री खतांचा साठा भरपूर दाखवला जातो, मग प्रत्यक्षात शेतकऱ्यांना खत का मिळत नाही? हा साठा नेमका कुठे जातोय? कोणाच्या आशीर्वादाने साठेबाजी सुरू आहे? शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई कधी होणार?असा सवाल करतपटारे यांनी सांगितले की जर तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली नाही, तर शेतकऱ्यांसह तीव्र आंदोलन छेडले जाईल.

दरम्यान, कृषी विभागाने याबाबत अद्याप ठोस भूमिका स्पष्ट केलेली नसून, पुरवठा सुरळीत आहे असे सांगितले जात आहे. मात्र वास्तवात शेतकरी खतासाठी मात्र गेल्या सहा महिन्यापासून भटकंती करत असल्याचे चित्र तालुक्यात स्पष्ट आहे. खत विक्रेत्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळुनुक व अवाजवी दराने खत विक्री अनेक तक्रारी येऊन देखील कृषी विभाग कडून अद्याप पर्यंत एकही ठोस कार्यवाही झालेली दिसत नाही. कृषी विभागाचे अधिकारी तालुक्यात एवढा सावळा गोंधळ असून देखील गप्प का?? एकही कृषी सेवा केंद्रावर कार्यवाही नाही. प्रशासनासमोर आता मोठे प्रश्न :

### खतांचा साठा असूनही विक्री का होत नाही?

काळाबाजार आणि साठेबाजीला कोणाचा पाठिंबा? उन्हाळ्यात जर घट्ट जाई असेल तर खरीप हंगामात काय???खरिप हंगामापूर्वी नियोजन फक्त कागदावरच का?? अगदी पाच किलोमीटर असलेला गंगापूर तालुक्यात कायगाव टोका येथे बाराही महिने खत मुबलक प्रमाणात उपलब्ध असते नेमकं नेवासा तालुक्याचा कोठा जातोय कुठे? गंगापूर तालुक्यात खत मिळतंय नेवाशात का नाही याचं गोड बंगाल नेमकं काय? हा नेवासा तालुक्यातील शेतकऱ्याकडे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. खताचा बफर स्टॉक खुला करून लिंकिंग प्रक्रिया बंद करावी व शेतकऱ्याला मुबलक खताची पूर्तता करावी अशी मागणी नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांची कडून होत आहे.

या संपूर्ण प्रकरणामुळे नेवासा तालुक्यात प्रशासनाच्या विरोधात रोष वाढत असून, यामध्ये कृषी विभागाचे काही भ्रष्ट व निष्क्रिय अधिकारी सामील असल्याचे बोलले जात आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना भेटून लवकरच या भ्रष्ट व निष्क्रिय अधिकाऱ्याबद्दल निलंबनाचीकारवाईची मागणी करणार असल्याचे पटारे यांनी सांगितले . शेतकऱ्यांना वेळेत खत मिळाले नाही, तर येणारा हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे.

## यांत्रिकीतील बदलते तंत्रज्ञान समजून घ्या : दिपक जगदाळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**प्रवरानगर** : अभियांत्रिकी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने वाढता वापर लक्षात घेता विद्यार्थ्यांनी कौशल्याधारित शिक्षणावर भर देऊन स्वतःच्या ज्ञानाच्या बळावर प्रगती साधणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुणे येथील कोलेड इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि.चे व्यवस्थापकीय संचालक तथा माजी विद्यार्थी दीपक जगदाळे यांनी केले.



लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालय, लोणी येथे विविध अभियांत्रिकी विभागांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'झठएउउजछ २०२६' या चौथ्या राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते.

या वेळी संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, समन्वयक डॉ. सतीश तुरकणे, डॉ. पंकज चित्ते, डॉ. सीमा लव्हाटे, डॉ. मिनीनाथ बेंद्रे, डॉ. वैशाली विखे, डॉ. सुनिल मिसाळ तसेच रजिस्ट्रार नकुल तांबे उपस्थित होते. देशभरातील संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.जगदाळे यांनी आपल्या भाषणात प्रवरेतील शैक्षणिक प्रवास उलगडत विद्यार्थ्यांना उद्योगक्षेत्रातील वास्तवाची जाणीव करून दिली. ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील झपाट्याने होणारे तांत्रिक बदल, उपलब्ध होणाऱ्या नव्या संधी आणि कौशल्यविकासाचे वाढते महत्त्व यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. केवळ शैक्षणिक ज्ञानावर न थांबता उद्योगाभिमुख दृष्टिकोन स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांनी सकारात्मक विचारसरणी, आत्मविश्वास आणि उद्योजकतेच्या दिशेने वाटचाल करावी, असे सांगितले. नोकरीच्या पलीकडे जाऊन उद्योजक बनण्याचा विचार करून स्वतःच्या कल्पनांवर काम करत समाजासाठी मूल्यनिर्मिती करावी, असेही त्यांनी नमूद केले. संस्थेकडून विद्यार्थ्यांना आवश्यक ते सर्व पाठबळ दिले जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.परिषदेअंतर्गत विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेसाठी एकूण १०५ संशोधन निबंध सादरीकरणासाठी स्वीकारण्यात आले होते, तर १३५ हून अधिक सहभागी उपस्थित होते. देशातील चार राज्यांमधील ४० पेक्षा अधिक नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांमधून विद्यार्थी व संशोधकांनी सहभाग नोंदविला. प्रास्ताविक परिषदेचे समन्वयक डॉ. सतीश तुरकणे यांनी करत परिषदेमागील उद्दिष्ट स्पष्ट केले. बदलत्या तंत्रज्ञानाच्या युगात संशोधनाची गरज आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा परिषदांचे महत्त्व त्यांनी विशद केले.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन समन्वयक डॉ. राजेश भांबारे यांनी केले

## उंदीरगाव ग्रामपंचायतीत महान व्यक्तींच्या स्मारक उभारणीसाठी ठराव मंजूर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिरसगाव** : उंदीरगाव ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत गावाच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला. ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील पंडित यांनी गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, अण्णाभाऊ साठे तसेच माजी आमदार भास्करराव गलांडे पाटील यांच्या स्मारकांची उभारणी करण्याची मागणी सभेत मांडली.

या प्रस्तावाला सरपंच, उपसरपंच आणि सर्व ग्रामपंचायत सदस्यांनी एकमताने पाठिंबा दर्शविला. सभेस उपस्थित असलेले अशोक सहकारी साखर कारखान्याचे संचालक वीरेश गलांडे पाटील यांनीही प्रस्तावास संमती दिली.

समाजासाठी महान व्यक्तींनी दिलेल्या योगदानाची जपणूक व्हावी आणि पुढील पिढ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने स्मारके उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. या विषयावर सभेत सकारात्मक चर्चा होऊन आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया तात्काळ सुरू करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

शासकीय नियमांनुसार प्रस्ताव तयार करून मंजुरीसाठी शासनाकडे सादर करण्यात येणार असून, या निर्णयामुळे उंदीरगावच्या सामाजिक व सांस्कृतिक विकासाला नवी दिशा मिळणार आहे. ग्रामस्थांकडून या निर्णयाचे स्वागत होत असून, गावाच्या गौरवात भर घालणारा हा उपक्रम ठरणार असल्याची भावना व्यक्त होत आहे.

द·ख·ल



## मदतीअभावी मादी हरिणाचा मृत्यू

**श्रीगोंदा :** आढळगाव येथील खैरओढा परिसरात राष्ट्रीय महामार्ग ५४८–डी लगत गुरुवारी दुपारी सुमारे पावणे पाच वाजण्याच्या सुमारास जखमी अवस्थेत विव्हळत पडलेल्या मादी हरिणाचा अखेर मदतीअभावी मृत्यू झाला. अज्ञात वाहनाच्या धडकेत गंभीर जखमी झालेल्या या हरिणाने तब्बल दीड तास मृत्यूशी झुंज दिली; मात्र वन विभागाकडून वेळेत कोणतीही मदत न मिळाल्याने तिचा जीव गेला.

घटनेची माहिती मिळताच स्थानिकांनी तात्काळ वन विभागाशी संपर्क साधला. हेल्पलाईनवरही वारंवार कळविण्यात आले. काही संवेदनशील नागरिकांनी जखमी हरिणाजवळ थांबून मदतीची वाट पाहिली; जखमा पाहून अनेकांचे मन हेलावले. मात्र, दीड तास उलटूनही वन विभागाचा एकही अधिकारी किंवा कर्मचारी घटनास्थळी पोहोचला नाही.दरम्यान, उपचाराच्या प्रतीक्षेत असलेले हरिण अखेर शांत झाले आणि काही वेळानंतर वनमजूर घटनास्थळी दाखल झाला. तोपर्यंत खूप उशीर झाला होता. मृत हरिण पुढील प्रक्रियेसाठी ताब्यात घेण्यात आले.या प्रकारामुळे वन विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. रस्त्याच्या कामासाठी हद्दीचे वाद घालणारा विभाग, वन्यजीवांच्या जीवितासाठी मात्र उदासीन का? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## कामधेनू शेतकरी गटाची खरीप पूर्व नियोजन बैठक उत्साहात



**जामखेड :** जामखेड तालुक्यातील जवळा येथे कामधेनू शेतकरी गटाची खरीप हंगाम पूर्व नियोजन बैठक सदस्य रमेश रोडे यांच्या शेतावर घेण्यात आली. यावेळी जवळा चे सहाय्यक कृषी अधिकारी सागर बोलभट यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

बैठकीतील ठळक मुद्दे:हवामान व पीक नियोजन एल निनोच्या संभाव्य प्रभावामुळे मान्सूनवर होणाऱ्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर तुर, उडीद या प्रमुख खरीप पिकांच्या नियोजनाबाबत सागर बोलभट यांनी मार्गदर्शन केले. तांत्रिक मार्गदर्शन शेतकऱ्यांना बीजप्रक्रिया, बियाण्याची उगवण क्षमता चाचणी, सापळा पिकांची लागवड व एकात्मिक कीड नियंत्रणातील चिकट सापळ्यांच्या वापराबाबत सविस्तर माहिती दिली. हुमणी कीड नियंत्रण हुमणी किडीचा जीवनक्रम समजावून सांगून प्रकाश सापळ्यांद्वारे तिच्या नियंत्रणाचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. जलतारा प्रकल्प गटाचे सचिव रामहरी रोडे यांनी जलतारा प्रकल्पाचे फायदे व जलसंधारणाचे महत्त्व विशद केले. फार्मर कप नोंदणी यावेळी गटातील इच्छुक शेतकऱ्यांची पाणी फौंडेशनच्या फार्मर कप स्पर्धेसाठी नोंदणी करण्यात आली. गटाचे अध्यक्ष हरिदास काकडे व सचिव रामहरी रोडे यांच्यासह सर्व सदस्यांच्या उपस्थितीत ही शेतीशाळा यशस्वी झाली.

## जिल्हा परिषदेचे राजेंद्र नायर, सुनील राऊत, अनिल शिंदे यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा




**अहिल्यानगर :** जिल्हा परिषदेचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्वीय सहायक राजेंद्र नायर, सुनील राऊत कनिष्ठ प्रशासनाधिकारी पशुसंवर्धन विभाग, अनिल शिंदे वाहन चालक आरोग्य विभाग यांच्या सेवापुर्ती सोहळ्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या सभागृहात यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता याप्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी,अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके, दादाभाऊ गुंजाळ, शिक्षणाधिकारी भास्कर पाटील,जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बापूसाहेब नागरगोजे मुख्य लेखा वित्त अधिकारी शैलेश मोरे पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. उमेश पाटील, डॉ. दशरथ दिघे,विकास साळुंके, सुभाष कराळे, ग्रामपंचायत अधिकारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष युवराज पाटील, अभय गट,राजेंद्र नवले, प्रशांत मोरे, नारायण येवले, कल्पना शिंदे, विजया गायकवाड, स्मिता उंडे, विद्या झरेकर आदींसह कर्मचारी अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाप्रसंगी भंडारी म्हणाले शासकीय सेवा असो की खासगी नोकरी. काही ठराविक कालावधीनंतर सेवानिवृत्ती होतच असते. नोकरीला लागल्यापासून सेवानिवृत्त होईपर्यंत आपण केलेले कष्ट, नोकरीला दिलेला न्याय, केलेले काम हाच प्रत्येकासाठी अनमोल ठेवा असतो. शासकीय नोकरी करताना प्रत्येकाला चांगले वाईट अनुभव येत असतात. अशा अनुभवातून शिकतच पुढे जायचे असते.

# कर्जत नगरपंचायतीचा गटनेता कोण ? फैसला ५ मे ला

## आजच्या सुनावणीत गटनेते मेहेत्रे गटाने वेळ मागितल्याने जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय पुढे ढकलला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

कर्जत : कर्जत नगरपंचायत गटनेता बदलाबाबत बुधवारी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांनी कर्जतच्या १५ नगरसेवकांची बैठक बोलावली होती. त्यात गटनेते असणारे संतोष मेहेत्रे यांच्या गटाने सदर घटनेचा अभ्यास करण्यासाठी यासह उपगटनेता यांनी सादर केलेल्या कागदपत्राची प्रत मिळावी यासाठी वेळ मागितल्याने पुन्हा ५ मे ला बैठक होणार असून १५ नगरसेवकांना उपस्थित राहण्याबाबत जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. कर्जत नगरपंचायतीमध्ये पुन्हा एकदा राजकीय पदावरून सत्ताधारी गटात धुसफुस पहावयास मिळत आहे. यात कोण बाजी मारेल हे पाहणे महत्वपूर्ण ठरणार आहे.

कर्जत नगरपंचायतीमध्ये गटनेते संतोष मेहेत्रे आणि उपगटनेते सतीश पाटील यांच्या अधिकारावरून वाद उफाळला आहे. वास्तविक पाहता यास नगराध्यक्षा आणि उपनगराध्यक्ष पदाच्या बदलाची झालर आहे. मागील आठवड्यात २४ एप्रिलला राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या १५ पैकी ९ नगरसेवकांनी उपगटनेते पाटील यांच्या पत्रावरून बैठक घेत गटनेते संतोष मेहेत्रे यांच्यावर अविश्वास दाखवत जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे गटनेता बदलण्याचा मागणी प्रस्ताव दाखल केला होता. तर गटनेते मेहेत्रे यांनी पाटील यांनी बोलावलेली बैठकच घटनाबाह्य आणि बेकायदेशीर असून उपगटनेते पद रद्द करण्याचे पत्र जिल्हाधिकारी यांना दिले होते. या दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या वादाची परिस्थिती पाहता बुधवार, दि २९ रोजी दुपारी साडे बारा वाजता जिल्हाधिकारी यांनी १५ नगरसेवकांची बैठक बोलावली होती. त्यानुसार कर्जतचे १५ नगरसेवक बैठकीस उपस्थित राहिले. सुनावणी सुरू असताना विद्यमान गटनेते मेहेत्रे यांच्या कायदेशीर सल्लागाराने आम्हांस आपले म्हणणे सादर करण्यासाठी थोडा अवधी मिळावा. तसेच उपगटनेते यांनी गटनेते बदलाबाबत जे कागदपत्रे सादर केली आहेत. त्याची प्रत मिळावी यासाठी वेळ मागितला असल्याची माहिती कर्जतच्या एका नगरसेवकाने दिली. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाने कर्जतच्या १५ नगरसेवकांना मंगळवार, दि ५ मे रोजी पुन्हा बैठकीस उपस्थित राहण्याबाबत सूचित केले आहे. त्यामुळे गटनेता बदलणार की ? आहे तोच कायम राहणार यासाठी ५ मे पर्यंत वाट पाहावी लागणार आहे.

### गटनेता बदलासाठी राम शिंदे, रोहित पवार गट एकत्र

कर्जत नगरपंचायतीच्या चार वर्षांच्या राजकारणात कोण मित्र आणि कोण विरोधक सांगता येणे कठीण जात असून माजी नगराध्यक्षा उषा राऊत यांच्यावर १५ पैकी ११ नगरसेवकांनी अविश्वास आणला होता. ४ नगरसेवक रोहित पवार यांच्याबरोबर कायम राहिले होते. आता गटनेता बदलासाठी रोहित पवार गटाचे ४ नगरसेवकांनी राम शिंदे गटास उघड मदत केल्याचे दिसत आहे. गटनेता बदलला तर उद्या विद्यमान नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्या पदावर देखील गडांतर येऊ शकते अशी चर्चा कर्जतच्या स्थानिक राजकारणात दबक्या आवाजात सुरू आहे.

# सासरवाडीच्या विकास कामांना प्राधान्य देऊ : आ. प्रसाद लाड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तिसगाव :** पाथर्डी तालुका माझी सासरवाडी आहे त्यामुळे निंबोडी असो अथवा तिसगाव या गावच्या विकास कामासाठी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा करू विकास कामात कुठे कमी पडणार नाही शेवटी सासुरवारीच्या कामांना प्राधान्य द्यावाच लागेल अशा शब्दात महायुती सरकारचे समन्वयक आमदार प्रसाद लाड यांनी तिसगावच्या विकास कामांना गती देण्याचा शब्द तिसगावकरांना दिला आहे.

तिसगावचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील लवांडे युवानेते कुशल भापसे राहुल कारखेले नंदकुमार लोखंडे प्रसाद देशमुख सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ कातखडे चेअरमन पुरुषोत्तम आठरे सुनील शिंगवी विक्रमराव ससाने शिक्षक बँकेचे संचालक कल्याण लवांडे शिक्षक नेते महेश लोखंडे बोरुडे सर युवानेते भाऊसाहेब लवांडे सचिन साळवे गीताराम वाघ दादासाहेब पाठक प्रणील सावंत पिंटू परमार देविदास माने अरुणदेवा पुंड संजय स्वामी यांच्यासह तिसगाव येथील अनेक प्रमुख मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. तिसगावचा पिण्याच्या पाण्याचा अथवा वांबोरी चारीचा पाण्याचा प्रश्न तसेच तिसगाव ते चिचोंडी या रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न देखील निश्चितपणे मार्गे लावला जाईल. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पाणी प्रश्न मार्गी लावला लावू तर तिसगाव ते चिचोंडी रस्त्याचा प्रश्न सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या माध्यमातून निश्चितपणे मार्गे लावला जाईल असा शब्द आमदार प्रसाद लाड यांनी यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिला.

यावेळी आमदार प्रसाद लाड यांनी तिसगाव ते चिचोंडी रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना फोन करून या रस्त्याच्या कामासाठी तात्काळ निधी देण्याचे विनंती केली मुख्यमंत्री सडक योजनेतून या रस्त्याला निधी देणार असल्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले यावेळी आमदार प्रसाद लाड म्हणाले सासरवाडीला शब्द दिलाय तेवढा पूर्ण करा.

# शेवगावात भव्य अध्यात्मिक बाल सुसंस्कार शिबिर

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**शेवगाव :** शेवगाव शहरातील विश्वमाऊली गुरुकुल, शेवगाव यांच्या वतीने आध्यात्मिक बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता ४ थी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी असून शिबिराचा प्रारंभ १ मे २०२६ रोजी होणार असून समारोप १५ मे २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

या शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना प्राथमिक मृदंग, प्राथमिक गायन, वारकरी चाली, टाळ, संत चरित्र, हनुमान चालीसा, हरिपाठ, गीता, संस्कृत श्लोक, योग, बौद्धिक खेळ, धर्म व संस्कृती यांसारख्या विविध विषयांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांसाठी दिवसातून तीन वेळा शुद्ध भोजन व प्रशस्त निवास व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

आम्ही फक्त मुलंच नाही तर एक सुसंस्कृत पिढी घडवतो या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले असून पंचक्रोशीतील कीर्तनकार, प्रवचनकार, कथाकार, गायनाचार्य, मृदंगाचार्य यांची सदिच्छा भेट व मार्गदर्शन लाभणार आहे.

प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून दिनांक १ जून २०२६ पासून विश्वमाऊली आध्यात्मिक गुरुकुल, शेवगाव येथे नियमित प्रवेश दिला जाणार आहे. इच्छुक पालकांनी व विद्यार्थ्यांनी लवकरात लवकर नोंदणी करावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

या उपक्रमाचे आयोजन पवन मारुती मंदिर देवस्थान ट्रस्ट, शहीद भगतसिंग मित्र मंडळ, टिळक युवक मंडळ व विश्वमाऊली गुरुकुल, शेवगाव यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी गुरुवर्य ह.भ.प. संदीपान महाराज म्हस्के शास्त्री यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पोलीस अधीक्षक कार्यालयासमोरील उपोषणाला रिपाई महिला आघाडीचा पाठिंबा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नितीन शिरसाठ यांच्या निर्घृण खुनातील आरोपींना तात्काळ अटक करावी व त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात यावी, या मागणीसाठी शिरसाठ कुटुंबीयांसह गावातील महिलांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालया समोर मुलाबाळांसह उपोषण सुरु केलेले आहे. उपोषणाच्या तिसऱ्या दिवशी बुधवारी (दि.२९ एप्रिल) रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) महिला आघाडीच्या वतीने पाठिंबा देण्यात आला.

पाठिंब्याचे पत्र रिपाई महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्षा ज्योतीताई पवार यांनी स्वाती नितीन शिरसाठ यांना दिले. यावेळी महिला आघाडीच्या शहर जिल्हाध्यक्ष शीतल नाटेकर, शहर उपाध्यक्ष सोनाली साळवे, शहराध्यक्ष सविता भालेराव, विश्रांती पठारे, तालुका अध्यक्ष सारिका साळवे, अलका अल्हाट, नंदा साळवे, सविता शिरसाठ, प्रतीक्षा लोखंडे, टेरेसा शिरसाठ, दिपाली शिरसाठ, संगीताताई शिरसाठ आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी घोडेश्वरी हॉस्पिटल, घोडेगाव (ता. नेवासा) येथे नितीन शिरसाठ यांची भरदिवसा गोळ्या झाडून निर्घृण हत्या करण्यात आली होती. या घटनेला तब्बल ७० ते ८० दिवस उलटूनही आरोपी अद्याप पोलिसांच्या ताब्यात आलेले नाहीत. मृत नितीन शिरसाठ यांच्या पत्नीने अत्यंत भावनिक शब्दांत आपली व्यथा मांडताना सांगितले की, मी त्या घटनेच्या वेळी घटनास्थळी उपस्थित होते. आमची ३ महिन्यांची मुलगी आहे व आणखी पाच लहान मुले आहेत. आरोपी अजूनही मोकाट असल्याने आमच्या कुटुंबावर केव्हाही हल्ला होऊ शकतो. आम्हाला सतत भीतीच्या छायेत जगावे लागत आहे. तसेच, आरोपींना कोणीतरी पाठीशी घालत असल्याचा संशय व्यक्त करत, पोलीस प्रशासनावर नेमका कोणाचा दबाव आहे? असा सवालही कुटुंबीयांनी उपस्थित केला.

सदर प्रकरणातील आरोपी हे 'फुलमाळी टोळी'शीसंबंधित असल्याचे सांगण्यात येत आहे. या टोळीवर यापूर्वीही अनेक गंभीर गुन्हे दाखल असल्याची माहिती असून, पोलीस प्रशासनाला याची पूर्ण कल्पना असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. तरीही त्यांच्यावर कठोर कारवाई का होत नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. ही टोळी संघटित पद्धतीने गुन्हे करत असल्याने त्यांच्यावर मोक्का अंतर्गत कारवाई होणे अत्यावश्यक आहे.

केवळ आश्वासन देऊन वेळकाढूपणा करण्याऐवजी पोलिसांनी महिलांच्या उपोषणाची दखल घेऊन ठोस पावले उचलावीत, अशी मागणी उपोषणकर्त्यांसह रिपाई महिला आघाडीच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे. नितीन शिरसाठ हत्याकांडातील आरोपींना तात्काळ अटक करण्यात आली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा रिपाई महिला आघाडीच्या वतीने देण्यात आला आहे.

# नर्मदा–गोदावरी नदीजोड प्रकल्प अशक्य; 'रेन गेन बॅटरी'च खरा पर्याय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** नर्मदा आणि गोदावरी नद्यांना जोडण्याची संकल्पना अनेक वर्षांपासून चर्चेत असली, तरी ती प्रत्यक्षात अशक्य, अव्यवहार्य आणि पर्यावरणदृष्ट्या धोकादायक असल्याचा दावा पीपल्स हेल्पलाईनच्या वतीने करण्यात आला आहे. त्याऐवजी रेन गेन बॅटरी ही पावसाचे पाणी जमिनीत मुरविणारी वैज्ञानिक पद्धतच महाराष्ट्रासाठी जलक्रांती घडवू शकते, असे मत व्यक्त करण्यात आले.

ॲड. कारभारी गवळी यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, नर्मदा नदी पश्चिमेकडे तर गोदावरी नदी पूर्वेकडे वाहते. या दोन नद्यांच्या मध्ये सातपुडा आणि विंध्य पर्वतरांगा असल्यामुळे पाण्याचा नैसर्गिक प्रवाह शक्य नाही. त्यामुळे प्रचंड पंपिंग, कृत्रिम उचल व्यवस्था आणि मोठ्या प्रमाणावर कालवे व बोगदे उभारावे लागतील. या प्रकल्पासाठी अंदाजे छ३ ते छ५ लाख कोटी खर्च अपेक्षित असून, त्यासोबतच सततचा वीजखर्चही मोठा असेल. त्यामुळे हा प्रकल्प आर्थिकदृष्ट्या परवडणारा नाही.

याशिवाय मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि गुजरात या राज्यांमध्ये पाण्याच्या हक्कावरून मोठे वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अतिरिक्त पाणी ही संकल्पनाही वास्तवात वादग्रस्त ठरू शकते, असेही त्यांनी नमूद केले. पर्यावरणीय दृष्टिकोनातूनही हा प्रकल्प गंभीर परिणाम घडवू शकतो. मोठ्या प्रमाणावर जंगलतोड, जैवविविधतेचे नुकसान आणि हजारो लोकांचे विस्थापन होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे नर्मदा–गोदावरी नदीजोड प्रकल्प व्यवहारात अशक्य असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

याउलट रेन गेन बॅटरी ही पावसाचे पाणी जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणारी प्रभावी आणि कमी खर्चिक पद्धत असल्याचे सांगण्यात आले. या तंत्रामुळे झाडांच्या मुळांजवळ वर्षभर ओलावा टिकून राहतो, भूजल पुनर्भरण होते आणि शेतीसाठी आवश्यक पाणी उपलब्ध राहते.

# राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल सज्ज

**अहिल्यानगर :** शहराच्या आरोग्य व्यवस्थेला नवी दिशा देणारे आणि नागरिकांसाठी अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणारे राजमाता जिजाऊ शहाजीराजे भोसले मल्टीस्पेशालिटी सुसज्ज हॉस्पिटल आता पूर्णत्वास आले असून लवकरच नगरकरांच्या सेवेत दाखल होणार आहे. गुडगाव रोड, भोसले आखाडा परिसरात उभारण्यात आलेल्या या भव्य रुग्णालयाची पाहणी आमदार संग्राम जगताप आणि माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केली. यावेळी आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, महेश लोंढे, शहर अभियंता मनोज पारखे, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, इंजिनिअर श्रीकांत निंबाळकर, इंजिनिअर गणेश गाडळकर, डॉ. दिलीप बागल, डॉ. सतीश सोनवणे, रोहन सानप आदी मान्यवर उपस्थित होते.

हे अत्याधुनिक रुग्णालय राज्याचे स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या प्रयत्नातून आणि आमदार संग्राम जगताप यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नियोजन समितीच्या निधीतून साकार झाले आहे. तब्बल ६२ हजार स्क्वेअर फुट क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या सहामजली इमारतीमुळे आता शहरातील नागरिकांना दर्जेदार व आधुनिक वैद्यकीय सुविधा स्थानिक पातळीवर उपलब्ध होणार आहेत.

# राज्यातील महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे पगार रखडले

## श्रमिक महासंघाने तातडीने राज्यस्तरीय बैठक घ्यावी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राज्यातील अनेक महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नसल्याने कर्मचारी गंभीर आर्थिक संकटात सापडले आहेत. दोन–दोन महिने पगार रखडत असल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह, कर्जाचे हप्ते, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि दैनंदिन गरजा भागविणे कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाने पुढाकार घेऊन राज्यातील महानगरपालिकांना एकत्रित करत तातडीने बैठक आयोजित करावी, अशी मागणी अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनने केली आहे.

यासंदर्भात महाराष्ट्र राज्य सर्व श्रमिक महासंघाचे सचिव कॉम्रेड उदय भट यांना निवेदन देण्यात आले. याबाबत माहिती देताना युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर, बाबासाहेब मुदगल व सचिव आनंद वायकर यांनी सांगितले की, महानगरपालिका कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून राज्यस्तरावर सामूहिक लढा उभारण्याची गरज निर्माण झाली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या दोन महिन्यांपासून राज्यातील 'ड' वर्ग महानगरपालिकांना एल.बी.टी. अनुदान (जी.एस.टी.) वेळेवर मिळत नाही. त्यामुळे अनेक महानगरपालिका तसेच इतर काही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कर्मचाऱ्यांचे वेतन व पेन्शन वेळेवर अदा होत नाही. फेब्रुवारी २०२६ चे अनुदान दि. ३० मार्च २०२६ रोजी प्राप्त झाले, तर मार्च २०२६ चे अनुदान अद्यापही संबंधित महानगरपालिकांना मिळालेले नाही.

ज्या महानगरपालिकांची आर्थिक परिस्थिती सक्षम नाही, अशा ठिकाणी कर्मचाऱ्यांचे वेतन, निवृत्त कर्मचाऱ्यांचे पेन्शन, तसेच इतर थकीत देणी देणे अत्यंत कठीण झाले आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांना कर्जबाजारीपणाला सामोरे जावे लागत आहे.

या पार्श्वभूमीवर महासंघाच्या वतीने पुणे येथे राज्यातील महानगरपालिका कामगार–कर्मचाऱ्यांची संयुक्त बैठक आयोजित करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या बैठकीत अनुदान वितरणातील विलंब, पगार व पेन्शन प्रश्न, तसेच कर्मचाऱ्यांच्या थकीत देण्यांवर सविस्तर चर्चा व्हावी, असे निवेदनात म्हटले आहे.

तसेच मुख्यमंत्री यांना महासंघाच्या वतीने निवेदन देऊन शिष्टमंडळास चर्चेसाठी वेळ मिळवून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या प्रतिनिधींनी या बैठकीस उपस्थित राहून आपल्या–आपल्या महानगरपालिकेतील पगार, पेन्शन आणि इतर थकबाकीचा तपशील लेखी स्वरूपात सादर करावा, असे आवाहन करण्यात यावे, असेही नमूद करण्यात आले आहे.

युनियन पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, जर शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर राज्यपातळीवर आंदोलन उभारण्याबाबतही बैठकीत निर्णय घेता येईल. कर्मचाऱ्यांचे प्रश्न केवळ स्थानिक पातळीवर न राहता आता राज्यव्यापी झाले असून त्यासाठी सर्व संघटनांनी एकत्र येण्याची गरज आहे. अखेर महासंघाने संलग्न व इतर महानगरपालिका–नगरपालिका कर्मचाऱ्यांची पुणे येथे तातडीने बैठक आयोजित करून वेळ व तारीख जाहीर करावी, अशी विनंती करण्यात आली आहे.

# सासवडचा संग्राम जगताप ठरला 'पुरंदर केसरी'

## नीरेच्या अली सय्यदवर मिळवला चितपट विजय

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने, पुरंदर नागरी सहकारी पतसंस्था आणि पुरंदर तालुका कुस्तीगीर संघाच्या वतीने आयोजित २० व्या 'पुरंदर केसरी' कुस्ती स्पर्धेत सासवडच्या संग्राम जगताप याने मैदान मारले. अंतिम लढतीत त्याने नीरेचा पैलवान अली सय्यद याला चितपट करून 'पुरंदर केसरी २०२६' हा मानाचा किताब पटकावला. सहकारमहर्षी स्व. चंदुकाका जगताप यांच्या स्मरणार्थ आणि माजी आमदार संजय जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली २६ व २७ एप्रिल रोजी या स्पर्धा पार पडल्या. अंतिम लढतीचे पंच म्हणून ज्येष्ठ मल्ल तात्यासाहेब भिंताडे यांनी काम पाहिले. संग्राम जगताप याला मान्यवरांच्या हस्ते ३५ हजार रुपये रोख, चांदीची गदा, मानपत्र आणि मानाचा किताब देऊन गौरविण्यात आले. तर उपविजेत्या अली सय्यद याला २७ हजार रुपये आणि ट्रॉफी प्रदान करण्यात आली. सिल्व्हर ज्युबिली मोटर्सच्या वतीने ही बक्षिसे पुरस्कृत करण्यात आली होती. या सोहळ्याला माजी आमदार संजय जगताप, ज्येष्ठ मल्ल तात्यासाहेब भिंताडे, कामगार केसरी पंडीत साबळे, वस्ताद ज्ञानेश्वर मांगडे, हरीभाऊ लोळे, माऊली यादव, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, नगरसेवक अजित जगताप, प्रदीप राऊत, ज्ञानेश्वर जगताप, संदीप फरतडे, पुरंदर नागरीचे उपाध्यक्ष कृष्णा शेट्टी, संचालक डॉ. विनायक खाडे, चंद्रकांत बोरकर, मानसिंग चव्हाण, प्रकाश पवार, रफिक शेख, संभाजी काळाणे, डॉ. मनोज शिंदे, संदीप जगताप, रमेश जगताप, नितीन भोंगळे, चेतन महाजन, माजी पुरंदर केसरी पै. नितीन मोडक, पै. प्रतिक जगताप, पै. रितेश मुळीक, बंटी मोडक, अमित गायकवाड, संदीपबापू जगताप, बाळासो जगताप, रमेश जगताप, ज्ञानदेव दिघे, रमेश मोडक, म्हस्कू दळवी, आण्णा काळे, डॉ. सुमित काकडे, सत्यजित जगताप आणि दिलीप मोरे यांसह हजारो कुस्तीशौकीन उपस्थित होते. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष पै. राजेंद्र जगताप, सदस्य पै. अशोक झेंडे, तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष पै. पांडुरंग कामथे, सचिव पै. रविंद्रपंत जगताप, सदस्य पै. बाळासाहेब कोलते, पै. विनोद जगताप, पै. अभिजित मोडक, पै. तानाजी काकडे, पै. चंद्रकांत गिरमे, पै. रमेश जगताप, पै. भाऊ मोरे, पै. गुलाब गायकवाड, पै. संतोष सोनवणे, पै. शरद जगदाळे, पै. संतोष काळांगे, पै. हरीभाऊ जेधे, पै. शेखर कटके, पै. तात्या झेंडे, पै. लक्ष्मण दिघे, पै. गणेश मुळीक, पै. रघुनाथ जगताप, पै. विशाल जगताप, पै. संजय क्षीरसागर, पै. माणिक भिसे, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, सतीश शिंदे, हरीभाऊ शिंदे, कानिफनाथ आमराळे, दिपक जगताप, प्रशिक्षक पै. माऊली खोपडे यांनी विशेष परिश्रम घेतले. आंतरराष्ट्रीय पंच रोहिदास आमले यांच्या मार्गदर्शनाखाली तुषार गोळे, अमित म्हस्के, चंद्रकांत मोहोळ, विक्रम पोवळे, गणेश जाधव यांनी पंच म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन रविंद्रपंत जगताप व जालिंदर काळे यांनी केले, तर मानपत्र वाचन प्राचार्य नंदकुमार सागर यांनी केले.

**वजन गटनिहाय विजेते आणि उपविजेते :**

- ३० किलो: राजवीर काळे (विजेता), कैवल्य भांडवलकर (उपविजेता)
- ३५ किलो: श्लोक वारे, अवधूत वासवंड
- ४० किलो: यश भोसले, आदेश मोडक
- ४५ किलो: सोहम मोटे, समर्थ शेळके
- ५० किलो: सार्थक दिघे, यश पेटकर
- ५५ किलो: शिवराज घिसरे, निल सोनवणे
- ६० किलो: ओम गायकवाड, सोहम हिवरकर
- ६६ किलो: समर्थ शेडगे, तिर्थराज जाधव
- ७४ किलो: राहुल कुंभारकर, प्रथमेश ढोणे
- खुला गट (पुरंदर केसरी): संग्राम जगताप, अली सय्यद



---

## द • ख • ल

### सामान्य कुटुंबातील ११ तरुण पोलीस दलात

**आळेफाटा :** अतिशय सामान्य कुटुंबातून येऊन जिद्द व मेहनतीच्या जोरावर पोलीस दलात भरती होण्याचे स्वप्न ११ विद्यार्थ्यांनी सत्यात उतरवले आहे. आळेफाटा (ता. जुन्नर )येथील सह्याद्री करिअर



अकॅडमीमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या या विद्यार्थ्यांची पोलीस भरतीत निवड झाली असून परिसरातून त्यांचे कौतुक होत आहे. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये श्वेता झोडगे, माधुरी डेरे, प्रियंका चासकर, नवनाथ बाचकर, सागर खिल्लारी, रोशन मिरपगार, सुप्रिया पावडे, शकीला शेख, सौरभ भोर, वैभव शेटे व अक्षय जाधव यांचा समावेश आहे.

**सह्याद्री करिअर अकॅडमीच्या मार्गदर्शनाला यश**

हे सर्व विद्यार्थी पारनेर, अकोले, आंबेगाव व जुन्नर या तालुक्यांतील ग्रामीण भागातील आहेत. या विद्यार्थ्यांना सह्याद्री करिअर अकॅडमीचे संचालक मयूर डुंबरे व गीताराम गायकर यांनी मार्गदर्शन केले. शारीरिक क्षमता चाचणीपासून ते लेखी परीक्षेपर्यंत सर्व टप्प्यांसाठी अकॅडमीमध्ये काटेकोर प्रशिक्षण देण्यात आले. घरची परिस्थिती बेताची असतानाही या विद्यार्थ्यांनी खचून न जाता सातत्यपूर्ण सराव केला. शस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय आई-वडील व मार्गदर्शक शिक्षकांना दिले आहे. मयूर डुंबरे व गीताराम गायकर यांनी सांगितले की, ''ग्रामीण भागातील मुलांमध्ये प्रचंड क्षमता आहे. फक्त योग्य दिशा मिळाली पाहिजे. या मुलांनी ती संधी सोडली नाही.'' या यशामुळे परिसरातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळाली असून सह्याद्री करिअर अकॅडमीचे सर्वत्र कौतुक होत आहे

### मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी कोटमदरा येथे कार्यशाळा संपन्न

**डिंभे :** आंबेगाव तालुक्यातील घोडेगाव वनपरीक्षेत्रातील कोटमदरा येथे मानव-बिबट व अन्य वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी आयोजित जनजागृती कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. वनसंरक्षक पुणे आशिष ठाकरे व उपवनसंरक्षक जुन्नर प्रशांत खाडे यांच्या संकल्पनेतून, तसेच सहाय्यक वनसंरक्षक अमृत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत वन्यजीव अभ्यासक नवनाथ फलके, वन्यजीव तज्ज्ञ सुशील



सहारे व सौमित्र तिजारे यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष मुरलीधर असवले यांनी अशा जनजागृती उपक्रमांची गावा-गावांत आवश्यकता असल्याचे सांगितले. उपसरपंच शुभांगी काळे यांनी जंगल व मानव यांच्यातील नात्याचे महत्त्व अधोरेखित केले. बिबट किंवा अन्य वन्यप्राणी समोर आल्यास घ्यावयाच्या खबरदारीबाबत वनपरीक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांनी माहिती दिली. यावेळी पोलीस पाटील सुनील डामसे, सामाजिक कार्यकर्त्या प्रतिभा भगत, वनपाल गुलाब इथापे, वनपाल प्रवीणकुमार लांघी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन वनपाल भाऊसाहेब झंझरे व वनरक्षक संजय गायकवाड यांनी केले. कार्यशाळेची सांगता भोजनाने झाली

### संजीवन समाधीवर साकारला श्री नृसिंह अवतार

**आळंदी :** श्री नृसिंह जयंतीच्या पावन निमित्ताने आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी परिसरात भगवान श्री नृसिंह अवताराची भव्य आणि देखणी साकारणा करण्यात आली. या आकर्षक कलाकृतीने भाविकांचे लक्ष वेधून घेत भक्तिमय वातावरणाची अनुभूती दिली. पुण्यातील मूर्तिकार अभिजीत धोंडफले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अत्यंत सुबक व प्रभावी पद्धतीने हा नृसिंह अवतार साकारला. बारकाईने



केलेली रचना, भावपूर्ण मुखमुद्रा आणि आकर्षक सजावटीमुळे हा अवतार भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरला. नृसिंह जयंतीनिमित्त मंदिर परिसरात दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. दर्शनासाठी आलेल्या भाविकांनी या अवताराचे दर्शन घेत भक्तिभाव व्यक्त केला. संजीवन समाधी परिसर 'नृसिंह मय' झाल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली.

---

# झेड पी सदस्याची दृष्टी ग्रामविकासाला नवी चालना देणारी, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** ग्रामविकासामध्ये जिल्हा परिषद सदस्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असून विकासात्मक दृष्टी ठेवून काम केले तर ग्रामविकासाला मोठी चालना मिळेल. त्यासाठी हे प्रशिक्षण मैलाचा दगड ठरेल असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी केले. राष्ट्रीय ग्रामस्वराज अभियान व राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा) यांच्या संयुक्त विद्यमाने यशदा, पुणे येथे नुकतीच राज्यातील नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्यांसाठी तीन दिवसीय पायाभूत प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या कार्यशाळेच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. या कार्यशाळेच्या पहिल्या टप्प्यात छत्रपती संभाजीनगर, परभणी, धाराशीव, लातूर व पुणे जिल्ह्यातील एकूण ८५ जिल्हा परिषद सदस्य सहभागी झाले होते. श्री. गोरे म्हणाले की, जिल्हा परिषदेमध्ये प्रभावीपणे काम करण्यासाठी सदस्यांना प्रशिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

ग्रामविकास विभागाच्या वतीने यशदा येथे नव्याने निवडून आलेल्या जिल्हा परिषद सदस्यांना विविध विषयांवरील सखोल मार्गदर्शन देण्यात आले. या प्रशिक्षणाचा उपयोग करून सदस्यांनी आपल्या मतदारसंघात सर्वांगीण विकासासाठी पुढाकार घ्यावा. राज्यात राबविण्यात येत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायत सक्षमीकरण अभियानाला मोठा प्रतिसाद मिळत असून प्रत्येक गाव समृद्ध करण्यासाठी जिल्हा परिषद सदस्यांनी सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी जिल्हा परिषद पुणे चे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे, अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, उपमहासंचालक डॉ.मल्लिनाथ कलशेट्टी तसेच सत्र संचालक आनंद पुसावळे व शरदचंद्र माळी उपस्थित होते.

---

# श्रमिक हो घ्या इथे विश्रांती ह केवळ सुभाषित नको, त्यानुसार उत्तम सुविधा द्या

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

पुणे : दमून-भागून आलेल्या चालक व वाहकांना योग्य विश्रांती मिळावी यासाठी त्यांच्या विश्रांतीगृहांमध्ये उत्तम सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. स्वच्छतागृहे टापटीप व स्वच्छ ठेवावीत, कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे शुद्ध पाणी तसेच अंघोळीसाठी गरम पाण्याची सोय करावीअशा घरगुती सुविधांची निर्मिती करावी, असे निर्देश परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी स्थानिक एसटी प्रशासनाला दिले. ते पुणे विभागातील वल्लभनगर बसस्थानकाला भेट दिली असता बोलत होते. चालक-वाहक हा एसटीचा कणा आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत कष्ट करून तो दररोज राज्यातील सुमारे ५० ते ५५ लाख प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतो. या कर्मचाऱ्यांना कर्तव्य पूर्ण झाल्यानंतर घरच्यासारख्या सुविधा मिळाल्यास ते अधिक उत्साहाने




सेवा बजावतील, असा मोलाचा सल्ला मंत्री सरनाईक यांनी दिला. बसस्थानकाची पाहणी करताना त्यांनी अनेक वर्षे बंद असलेले व्यापारी गाळे महिला बचत गटांना व होतकरू उद्योजक तरुणांना अत्यल्प भाड्यात उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले. यामुळे एसटी महामंडळाचा महसूल वाढेल तसेच प्रवासी व कर्मचाऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा मिळतील, असे त्यांनी नमूद केले. १ जूनपासून एसटीच्या सर्व उपहारगृहांत ४० रुपयांत चहा-नाश्ता महामार्गांवरील हॉटेल-मोटेलप्रमाणेच एसटी बसस्थानकांवरील उपहारगृहांमध्येही सर्व प्रवाशांना ४० रुपयांत चहा-नाश्ता देण्याची योजना १ जूनपासून सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी केली. या पाहणीदरम्यान खासदार श्रीरंग बारणे, स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच एसटीचे अधिकारी उपस्थित होते.

---

# शंभर जिल्हा परिषद शाळांत उभारणार 'स्किल लॅब', कौशल्याधारित शिक्षणाला नवी चालना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे सुपे :** राष्ट्रीय शिक्षण धोरण दोन हजार वीस च्या अनुषंगाने कौशल्याधारित शिक्षणाला चालना देण्यासाठी पुणे जिल्हा परिषदेकडून 'स्किल लॅब' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी अद्विक हाय-टेक कंपनीसोबत सामंजस्य करार करण्यात आला असून, पुढील तीन वर्षांत जिल्ह्यातील शंभर जिल्हा परिषद शाळांमध्ये स्किल लॅब उभारण्यात येणार आहेत. जिल्हा परिषद उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अद्विक हाय-टेकचे व्यवस्थापकीय संचालक आदित्य भारती, सदस्य प्राजक्ता दुर्गाडे, शिक्षण अधिकारी भाऊसाहेब कारेकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. या स्किल लॅबमध्ये विद्यार्थ्यांना लॅथिंग, सुतारकाम, दागिने बनविणे, स्वयंपाक, शिवणकाम, बागकाम यांसारख्या पारंपरिक कौशल्यांसह रोबोटिक्स यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली जाणार आहे. प्रत्यक्ष कामाच्या अनुभवावर आधारित शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना कौशल्यांचा उपयोग करता येणार असून, समस्या सोडविण्याची क्षमता, टीमवर्क आणि नवोपक्रमशीलता विकसित होण्यास मदत होईल. स्थानिक गरजांनुसार कौशल्य प्रशिक्षण देत विद्यार्थ्यांना स्वयंरोजगार, उद्योग किंवा उच्च शिक्षणासाठी सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हा उपक्रम परिवर्तनकारी ठरणार असून, शिक्षण आणि रोजगार यामधील दरी कमी करण्यास मदत होणार आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण धोरण दोन हजार वीस मध्ये कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्यात आला आहे. 'स्किल लॅब'मुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळेल आणि रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करता येतील. उपाध्यक्ष विवेक




वळसे पाटील म्हणाले, भविष्यातील पिढी सक्षम आणि आत्मनिर्भर होण्यासाठी शालेय स्तरावर कौशल्य शिक्षण आवश्यक आहे. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचा ठरेल. अद्विक हाय-टेकचे व्यवस्थापकीय संचालक आदित्य भारती यांनी सांगितले, कंपनीच्या सामाजिक बांधिलकीतून शिक्षण क्षेत्रात योगदान देत पारंपरिक कौशल्ये आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा संगम घडवून विद्यार्थ्यांना भविष्याभिमुख बनविण्याचा आमचा प्रयत्न आहे. 'स्किल लॅब' उपक्रमामुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण विद्यार्थ्यांना नव्या युगातील कौशल्ये शिकण्याची मोठी संधी उपलब्ध होणार आहे.

---

# इंद्रायणी नदीपात्रात दोन महिलांचे मृतदेह; आळंदीत खळबळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** तीर्थक्षेत्र आळंदी येथील सिद्धबेट परिसरात इंद्रायणी नदीपात्रात दोन अनोळखी महिलांचे मृतदेह तरंगताना आढळून आल्याने बुधवारी सायंकाळी परिसरात मोठी खळबळ उडाली. सायंकाळी सुमारे सातच्या सुमारास ही घटना उघडकीस आली असून, प्राथमिक तपासात आत्महत्येचा संशय व्यक्त करण्यात येत आहे. स्थानिक नागरिकांना नदीपात्रात काहीतरी तरंगत असल्याचे दिसून आल्यानंतर त्यांनी जवळ जाऊन पाहणी केली असता दोन महिलांचे मृतदेह असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर नागरिकांनी तातडीने आळंदी पोलिसांना कळविले. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत दोन्ही मृतदेह बाहेर काढले. घटनास्थळी पाहणी करताना या दोन्ही महिलांनी साडीच्या सहाय्याने एकमेकींना घट्ट बांधून घेतल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे दोघींनी एकत्रितपणे नदीत उडी घेत आत्महत्या केली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. मृतांपैकी एका महिलेचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्षे, तर दुसऱ्या महिलेचे वय सुमारे ३५ वर्षे असल्याचे समोर आले आहे. या महिला नेमक्या कोण, तसेच त्यांनी हे टोकाचे पाऊल का उचलले, याबाबत अद्याप माहिती समोर आलेली नाही. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात पाठविण्यात आले आहेत. या महिला माय-लेकी आहेत की नातेवाईक, याचा तपास आळंदी पोलीस करीत असून, परिसरातून कोणी बेपत्ता असल्याची नोंद आहे का याचीही पडताळणी सुरू आहे. दरम्यान, या घटनेमुळे आळंदी परिसरात हळहळ व्यक्त होत असून, नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

---

# संगीत प्रेमींनी जागवल्या आशा भोसले यांच्या आठवणी श्रद्धांजलीपर कार्यक्रमातून सासवडकरांचा पुढाकार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** भारताच्या प्रख्यात पार्श्वगायिका आशा भोसले यांचे नुकतेच वयाच्या ९२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या संगीतातील योगदानाबद्दल सासवडकर नागरिकांनी एका श्रद्धांजली कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सोपान नगर येथील मेघ मल्हार संगीत विद्यालयात पुरंदर कलामंचच्या पुढाकाराने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. आशा भोसले यांच्या अनेक आठवणी, त्यांच्या विविध शैलीतील गीतांचे रेकॉर्डिंग, कविता, त्यांच्यावरील लेखांचे वाचन अशा स्वरूपातील हा कार्यक्रम सुमारे दीड तासांहून अधिक काळ रंगला..

भिनी भिनी भोर.. ऐन दुपारी यमुना तीरी.. सांज ये गोकुळी सावळी... खातुबा... भोगले जे दुःख त्याला सुख म्हणावे... मन क्यूँ बहाका रे... दम मारो दम... ए मेरा दिल यार का दिवाना अशा नानाविध गीतांचे रेकॉर्डिंग सादर करत या कार्यक्रमात आशा भोसले यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा आढावा घेण्यात आला. एकाच या जन्मी जणू या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. संजय काटकर, शरद पाडसे, रेश्मा कामथे, स्नेहल देशपांडे,अश्विनी मोरे, प्रीतीदा माहूरकर, अनिल कदम, कलावती वेदपाठक, वीणा बागडे, गायत्री बेलसरे आदींनी आशा भोसले यांच्या सांगीतिक कारकिर्दीचा, वेगवेगळ्या आठवणींचा, त्या अनुषंगाने केलेल्या कवितांचा, लेखांचा प्रवास उलगडत त्यांच्याविषयी आदरांजली वाहिली.मोहन बागडे यांनी उत्तम संयोजन व सूत्रसंचालन केले. बापू गिरमे, राम दहिवाळ, निलेश शिंदे, सुवर्णा होले, ऐश्वर्या कामठे, गणेश बागडे, रणजीत गायकवाड, राजू भाटे, वृषाली चिंबळकर, संगीता बसाळे, प्रशाली गुरव, वैशाली बसाळे, अमोल बागडे यांसह मोठ्या संख्येने रसिक या प्रसंगी उपस्थित होते.

---

# ''कलासिद्धी नृत्यालयाचा'' रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन साजरा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** सासवडसह तालुक्यात अनेक ठिकाणी नृत्यकला शिकवणाऱ्या येथील कलासिद्धी नृत्यालयाचा २५ वा वर्धापन दिन सासवड येथील आचार्य अत्रे सांस्कृतिक भवनात नुकताच जागतिक नृत्य दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करून साजरा करण्यात आला. या निमित्ताने विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नटराज करंडक नृत्यस्पर्धा, संस्थेच्या वतीने अखिल भारतीय नाट्य परिषद सदस्य व नटरंग अकादमीचे कार्याध्यक्ष नृत्यदिग्दर्शक जतीन पांडे यांचा कलासिद्धी पुरस्कार प्रदान करून केलेला सन्मान सुमारे ७० विद्यार्थिनींचा सहभाग असलेला नृत्याविष्कार

दोन दिवसांपूर्वी सीमेवर लढताना शहीद झालेले पुरंदरचे सुपुत्र घनश्याम आढळगे यांना वाहिलेली श्रद्धांजली आशा विविध स्वरूपातील उपक्रमांनी हा सोहळा पार पडला

आदित्य ग्रुपच्या विद्या टिळेकर मणीकर्णिकी ग्रुपच्या मनिषा राऊत, स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानचे अध्यक्ष संतोष जगताप , हिरकणी बचत गटाच्या कुमुदिनी पांढरे, शहर पत्रकार संघाचे अध्यक्ष हेमंत ताकवले, अमित पवार,उद्योजक दिनेश पांढरे, ममता बालसदनच्या सुजाता गायकवाड , अश्विनी पांडे यांसह अनेक मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. दिप प्रज्वलन व नटराज पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.नृत्यालयाच्या संस्थापिका धनश्री लोमटे यांनी प्रास्तविक करून संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला.. पुरस्कारार्थी जतिन पांडे यांसह संतोष जगताप, हेमंत ताकवले ,विद्या टिळेकर ,मनिषा राऊत यांनी यावेळी मनोगतातून संस्थेला व उपक्रमास शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमात तिल्हाना वर्णम,देवीचा गोंधळ,पाश्च्यात्य नृत्य,गरबा,हिपहॉप तसेच बाजीप्रभू देशपांडे यांच्या प्रसंगावरील नृत्य नाटिका असे नानाविध नृत्याविष्कार सादर करत विद्यार्थिनींनी उपस्थितांच्या टाळ्या घेतल्या.स्वानंद लोमटे व किशोरी पवार यांनी उत्तम सूत्रसंचालन केले तर श्रीशा लोमटे यांनी आभार व्यक्त केले.मनषा जगताप, वैष्णवी रासकर रितुशा झगडे, वैभवी पराडकर सलोनी झेंडे, सपना पवार, चैतन्य खंडकर. युगंधरा खालकर,कमलेश सुतार, रमा जेधे यांसह नृत्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे उत्तम संयोजन केले





## जाहीर नोटीस

तमाम लोकांना तसेच विशेषतः गाव मौजे कानाडवाडी, ता. बारामती, जि. पुणे येथील परिसरातील सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत हि विद्यमान मालक १) विद्या आप्पासाहेब नलवडे, २) सुषमा अनिल शिंदे व ३) वैशाली सुनिल शिंदे यांचे खरेदीमालकीचे व ताबेवहिवाटीची शेतजमिन मिळकत एकूण क्षेत्र ५ हे ३३ आर, विहीर व पाईपलाईनसहीत हे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांना विक्री करणेचे ठरवून आमचे अशिलांकडून विद्यमान मालक यांनी धनादेशाने विसाराची रक्कम स्विकारून व्यवहार ठरवून विसारपावती करून दिली आहे. विद्यमान मालक यांनी सदरील मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व विश्वास आमचे अशिलांना दिला आहे. सबब खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतीवर कोणाचाही कसलाही हक्क, हितसंबध, अधिकार, ताबा, वहिवाट, अग्रहक्क, खरेदी, विक्री, अदलाबदल, करार, मदार, इजमेंट, भाडेपट्टा, दान, गहान, बक्षिस, लिज, लिन, दावा, जप्ती, कुळ, खंडकरी, भाडेकरू, बोजा, तक्रार, फिर्याद, साठेखत, वारसाहक्क, कुलमुखत्यार, पोटगी, वगैरे काही असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसांचे आत आम्हास लेखी कळवून योग्य त्या कायदेशीर कागदपत्रानिशी आमची खात्री करून दयावी. सदर कामी कसूर केल्यास कोणाचाही, कसलाही हक्क, हित संबंध, अधिकार, ताबा, वहिवाट, अग्रहक्क नाही वा असल्यास तो जाणीव पूर्वक सोडून दिलेला आहे, अशा चांगल्या समजुतीने आमचे अशिल सदरचा उर्वरित खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. तदनंतर कोणाचीही कसलीही तक्रार, हरकत ऐकली जाणार नाही, याची नोंद घ्यावी. परिशिष्ट- मिळकतीचे वर्णन - गाव मौजे कानाडवाडी, ता. बारामती, जि.पुणे येथील जमीन गट क्र.५१ मधील ४ हे ४४ आर + पो.ख.१ हे ४८ आर एकूण क्षेत्र ५ हे ९२ आर यापैकी वरील नमूद विद्यमान मालक नं.१ ते ३ (खरेदी देणार) यांचे खरेदी मालकीचे एकूण क्षेत्र ४ हे ०० आर + पो.ख. १ हे ३३ आर असे संपूर्ण व एकूण क्षेत्र ५ हे ३३ आर विहीर व पाईपलाईनसह, यासी चर्तुः सिमा पूर्वेस - गट क्र ५० ही मिळकत, दक्षिणेस - रस्ता व चोपडजची शिव, पश्चिमेस - गट नं.५४ व ५२ ही मिळकत, उत्तरेस-गट नं.४९ ही मिळकत. येणेप्रमाणे चर्तुःसिमापुर्वक व त्यामधील तदंगभूत वस्तूसह व इजमेंटच्या हक्कासह जमिन मिळकत या जाहिर नोटीसीचा विषय असे.

**ॲड. श्री. ज्ञानेश्वर शंकरराव पिसे**
**'हरेकृष्ण' गुनवडी-मळद रोड बारामती,**
**ता. बारामती, जि.पुणे. मो. नं. ९५९५९५ २७ ७०/९८२२८७७४९१**

# कोणतेही रस्ते अडवल्यास आधार कार्ड व फार्मर आयडी पाच वर्षाकरिता ब्लॉक करणार : तहसीलदार डोंगरे

## श्रीगोंद्यातील शेतावर जाणारे बंद रस्ते ४ मे ते २८ मे पर्यंत खुले करण्याचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : गाव नकाशा प्रमाणे अतिक्रमित व बंद झालेले शिवरस्ते, गाडीरस्ते, पांधन, शेत रस्ते, बंदशिवार रस्ते आदी शेतावर जाण्याचे पाय मार्ग मोकळे करण्यासाठी श्रीगोंदाच्या तहसिल कार्यालयाकडून कालबद्ध कार्यक्रम हाती घेतला आहे. अशी माहिती श्रीगोंद्याचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी पत्रकारांना दिली.

श्रीगोंदा येथील तहसिल कार्यालयात शेतात पांनंद रस्ते चळवळीच्या वतीने व शासन आदेशानुसार रस्ते पीडित शेतकऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी अनेक शेतकऱ्यांचे मामलेदार कोर्ट क्ट नुसार रस्ते खुले करण्याचा निर्णय झाला. परंतु त्याची पुढे प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शेतपानंद चळवळीच्या पदाधिकाऱ्यांसमवेत याबाबत रस्ते खुले करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या निर्णयामुळे रस्ते पीडित शेतकऱ्यांना मोठा होता न्याय मिळणार असल्याचे निश्चित झाले आहे. याप्रसंगी प्रासविकात शेतपानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी शेतपांनंद रस्ते चळवळीचा उद्देश स्पष्ट केला ज्या पिढीत शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता नाही. त्यांनी रीतसर मामलेदार कोर्टात अर्ज दाखल करून आपल्या हक्काचा रस्ता मिळवावा. तसेच ज्या रस्त्या संदर्भात निकाल लागले त्याची प्रभावी कार्यवाही तहसिल कार्यालकडून व्हावी, यावेळी शेत पानंद रस्ते चळवळ खंबीरपणे प्रशासनाच्या व शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभा राहील, हा उद्देश या बैठकीचा असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी तहसीलदार डोंगरे म्हणाले की, शासन आदेशाप्रमाणे शेतावर जाण्याचे कोणतेही रस्ते संबंधित शेतकऱ्यांनी अडवल्यास व रस्त्याचे नुकसान करणाऱ्याचे आधार कार्ड व फार्मर आयडी पाच वर्षाकरिता ब्लॉक करण्यात येईल, तसेच शासनाच्या विविध योजनांचे लाभ व कोणतीही शासकीय मदत मिळण्यापासून अपात्र ठरेल. ही बाब संबंधित अतिक्रमणधारक यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी, असे आदेश श्रीगोंद्याचे तहसीलदार सचिन डोंगरे यांनी तालुक्यातील दहा मंडळाधिकाऱ्यांना एका आदेशाद्वारे सूचना करण्यात आले आहेत. यावेळी शासन निर्णयाचा आधार घेत तहसीलदार श्री डोंगरे यांनी सांगितले की, दिनांक २५ मार्च २०२६ अन्वये जर अतिक्रमण करणाऱ्याने अतिक्रमण काढले नाहीत तर सदर अतिक्रमण शासन स्तरावरून तहसीलदार यांच्यामार्फत काढण्यात येईल. व शेतकऱ्यांचा ये-जा करण्याचा हक्क मान्य करण्यात प्राधान्य देण्यात येणार आहे.

या बैठकीस शेतपानंद रस्ते चळवळीचे राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील, शेतपानंद रस्ते चळवळीचे ड राजेंद्र निळकंठ नागवडे, ॲड. अशोक कडूस पाटील, भुमिअभिलेखचे कार्यालयीन अधीक्षक शिंगाडे, शेतकरी विठ्ठल जरांगे, मच्छिंद्र पवार, अशोक वाल्हेकर, पत्रकार नंदकुमार कुरुमकर यासह तालुक्यातील रस्ते पीडित शेतकरी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आभार ड राजेंद्र नागवडे यांनी मानले.

## शिक्षक हा समाजाचा खरा शिल्पकार : ॲड.आठरे पाटील

### न्यू आर्टस महाविद्यालयाचे मालुंजकर व गायकवाड यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : न्यू आर्टस कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालय राज्यात नंबर एक होण्यासाठी आणि स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळवण्यासाठी प्राध्यापकांचे मोठे योगदान आहे. मात्र, हेच प्राध्यापक हळूहळू सेवानिवृत्त होत असल्याने खंत वाटते. शिक्षक हा समाजाचा शिल्पकार असून, तो समाजाला दिशा देत घडवतो, असे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील यांनी केले.

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या न्यू आर्टस कॉमर्स ण्ड सायन्स महाविद्यालयातील मराठी विभागातील प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व गणित विभाग प्रमुख प्रा. डॉ. श्रीकीसन गायकवाड यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.

महाविद्यालयाच्या राजर्षी शाहू सभागृहात संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम पार पडला. यावेळी खजिनदार ड. दिपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, संचालक तथा माजी प्राचार्य डॉ. भास्करराव झावरे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, उपप्राचार्य (विज्ञान शाखा) डॉ. अनिल आठरे, उपप्राचार्य (वाणिज्य शाखा) डॉ. संजय कळमकर, सौ. मीनाक्षी मालुंजकर, सौ. गायकवाड, विजय पाटील (निफाड), अण्णा शिंदे (पुणे), प्रा. गणेश भगत, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, शब्बीर शेख, प्रा.डॉ. लक्ष्मण मतकर, डॉ. सोपान झुगे, ऋतुगंधा झुगे, तेजस्विनी मालुंजकर आदींसह सर्व प्राध्यापक बंधू-भगिनी व शिक्षकेत्तर सेवकवृंद आणि मालुंजकर व गायकवाड परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सोहळ्यात प्रा. डॉ. मालुंजकर व प्रा. डॉ. गायकवाड यांचा सपत्नीक सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक प्रा. डॉ. लक्ष्मीकांत येळवंडे यांनी केले . यावेळी माजी इतिहास विभाग प्रमुख डॉ. किसन अंबाडे, डॉ. प्रदीप मुटकुळे, डॉ. शिवाजी तरटे, ऋतुजा गायकवाड, रयत शिक्षण संस्थेचे मुख्याध्यापक विलास ठोकळ, डॉ. सुंदर गोरे तसेच उपप्राचार्य डॉ. अनिल आठरे यांनी भावना व्यक्त केल्या. प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी सांगितले की, प्रा. डॉ. श्रीकीसन गायकवाड यांनी गणित विषयातील दोन आंतरराष्ट्रीय परिषदांचे यशस्वी आयोजन केले.

माजी प्राचार्य भास्करराव झावरे म्हणाले की, दोन्ही प्राध्यापकांनी शैक्षणिक कार्यात कधीही तडजोड केली नाही. यावेळी प्रा. डॉ. मच्छिंद्र मालुंजकर व प्रा. डॉ. किसन गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र दरे यांनी दोन्ही प्राध्यापकांना सेवापूर्तीनिमित्त भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ. अशोक गायकवाड यांनी तर आभार प्रा. डॉ. संजय कळमकर यांनी मानले.

## मिरजगावमध्ये सचिन गायकवाड लिखित ड्रेस कोड कादंबरीचे दिल्लीत प्रकाशन



**मिरजगाव** : कर्जत तालुक्यातील रातंजन येथील सामाजिक कार्यकर्ते व प्रसिद्ध लेखक सचिन गायकवाड लिखित 'ड्रेस कोड' या कादंबरी पुस्तकाचे दिल्ली येथे जंतर - मंतर या ठिकाणी प्रकाशित करण्यात आली आहे.

ही 'ड्रेस कोड' कादंबरी बहुजन समाज पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा.मच्छिंद्र सकटे सर व माजी मंत्री रमेश बागवे यांचे सुपुत्र अविनाश बागवे यांच्या हस्ते आणि पुष्पालता सकटे, बहुजन समता पार्टीचे प्रदेश उपाध्यक्ष वसंतराव सकट यांच्यासह राज्यभरातीलप्रमुखमान्यवरांच्याउपस्थितीत दिल्लीत नुकतीच प्रकाशित करण्यात आली.

या कार्यक्रमाप्रसंगी राज्यभरातील कार्यकर्ते, प्रमुख मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

चालू सामाजिक परिस्थिती आणि त्यामध्ये चुकीच्या निर्णयामुळे भरडलेली जाणाऱ्या स्त्रिया त्यामुळे उद्ध्वस्त होणारे कौटुंबिक व्यवस्था या विषयांवर तब्बल १२० पाने असलेली ही कादंबरी लिहिण्यासाठी कर्जत तालुक्यातील कायम दुष्काळी असलेल्या ग्रामीण भागातील ध्येयवेडया लेखक सचिन गायकवाड यांना दीड वर्षाचा कालावधी गेला आहे.

ग्रामीण भागातील लेखक ही संकल्पना महाराष्ट्राच्या मातीतील जिद्द, संघर्ष आणि स्वप्नपूर्तीच्या कथांशी जोडलेली आहे. ग्रामीण भागातील अनेक लेखकांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वतःची ध्येय गाठले आहे.

## परमार्थात अहंकार हा मोठा अडसर आहे : डॉ. कुलकर्णी



**अहिल्यानगर :** मनुष्य जन्म हा दुर्लभ आहे. म्हणूनच या जन्मात आपला उद्धार करून घेतला पाहिजे. माझ्या या नर जन्माचे प्रयोजन काय याचा विवेक बुद्धीने प्रत्येकाने विचार करावा. बाबा बेलसरे म्हणतात, त्याप्रमाणे सतत 'मी' केले मीच कर्ता हा भाव ठेवल्यास तू कष्टी होशील तर, राम करता म्हणल्यास तुला यश प्राप्त होईल. म्हणूनच परमार्थात अहंकार हा मोठा अडसर आहे. असे प्रतिपादन डॉ सी.बी कुलकर्णी यांनी केले.

सावेडी ज्येष्ठ नागरिक मंचातर्फे यंदाच्या वर्षी ज्ञानविज्ञान पुरस्कार डॉ. चिंतामण भालचंद्र कुलकर्णी यांना प्रदान करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी डॉ.गौरी कुलकर्णी, कुमुदिनी बोपर्डीकर, लिलाताई गोविलकर, मंदाताई सोमणी, शोभा ढेपे, अँड.नीलिमा औटी,निरंजना देशमुख,सर्वोत्तम क्षीरसागर,अँड मनोहर केसकर,डॉ.कोलते सर, हरिश्चंद्र थिगळे, स्नेहल वेलनकर, मंदाताई कुलकर्णी, पुष्पा चितांबर, बाजीराव जाधव, शुभदा जागीरदार, पुष्पा कोरे, संतोष गोरे, श्रीकांत नाईक, हेमंत लोहगावकर, पांडुरंग कुलकर्णी, वैशाली भणगे, आदिनाथ जोशी,महापुरुष सर,चारुशीला करवंदे, बल भीम पांडव, उमेश कुलकर्णी अमोल हातवळणे उपस्थित होते.

## ढोरजळगांव प्राथमिक शाळेत चौथीच्या विद्यार्थांना निरोप

### पहिलीच्या विद्यार्थाचे स्वागत



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव** : शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत चौथीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व पहिल्याच्या विद्यार्थाचे स्वागत करण्यात आले.

यावेळी डॉ सुधाकर लांडे बोलताना म्हणाले की ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळामध्ये दर्जेदार शिक्षण मिळत असुन पालकांनी आपले पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये न घालता मराठी माध्यमाच्या शाळामध्ये प्रवेश घ्यावा. व आपल्या गांवच्या शाळेचा लौकिक वाढविवा असे लांडे यांनी बोलताना सांगितले. यावेळी भाऊसाहेब अकोलकर , शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश पाटेकर, सरपंच देविदास गि-हे, डॉ देविदास देशमुख, अजय साबळे, दत्तात्रय खोसे,नरेंद्र खोसे आदींसह मुख्याध्यापक संपत तुतारे शिक्षक सतोंष काळे शिक्षिका सौ अर्चना नजन आदी उपस्थित होते.

## श्रद्धेचा जयघोष.. कुस्तीचा थरार अन् वांगे भाकरीच्या महाप्रसादाचा सुगंध !

### जेऊरच्या मातीत होणार बायजामातेचा जयघोष : यात्रेनिमित्त परंपरेचा महाउत्सव !

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नगर तालुका** : नगर तालुक्यातील जेऊर गावचे ग्रामदैवत असलेल्या देवी बायजामाता यात्रा उत्सवाची तयारी पूर्णत्वास आली असून शुक्रवार दि.१ मे रोजी मोठ्या उत्साहात यात्रा उत्सवास प्रारंभ होत आहे. तीन दिवस चालणाऱ्या यात्रोत्सवात दोन दिवस कुस्त्यांचा हगामा अन् वांगे भाकरीच्या महाप्रसादाचे विशेष आकर्षण असते. यात्रा उत्सवानिमित्त जेऊरच्या मातीत देवी बायजामातेचा जयघोष पहावयास मिळणार आहे.

वैशाख बुद्ध पौर्णिमेला सालाबाद प्रमाणे देवी बायजामातेचा यात्रोत्सव भरत असतो. शुक्रवारी देवीला गंगेच्या पाण्याचा जलाभिषेक, कावड मिरवणूक, पालखी मिरवणूक, शोभेची दारू, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. शनिवार व रविवारी दोन दिवस कुस्त्यांचा हगामा व वांगे भाकरीच्या महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यात्रेनिमित्त विविध सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रमांची रेलचेल पहावयास मिळते.

धार्मिक विधी, देवीची पारंपारिक पूजा-अर्चा, भजन कीर्तन, महाआरती यांसह गावच्या सांस्कृतिक वैभवाचे दर्शन घडविणारे विविध कार्यक्रम पार पडत असतात. बायजामाता मंदिर परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. यात्रेचे मोठे वैशिष्ट्ये म्हणजे राज्यात नावाजलेला दोन दिवसांचा भव्य कुस्त्यांचा फड. कुस्ती मैदानात महाराष्ट्रातील नामांकित मल्ल हजेरी लावत असतात. ग्रामीण भागातील हजारो कुस्तीप्रेमींसाठी कुस्त्यांचा आखाडा यात्रेचे प्रमुख आकर्षण मानले जाते.

श्रद्धे इतकीच लोकसहभागाची ऐतिहासिक परंपरा जपणारा वांगे भाकरीचा महाप्रसाद हा यात्रेचा आत्मा मानला जातो. यात्रेच्या निमित्ताने परंपरेने गावच्या मुख्य वेशीमध्ये हजारो भाविकांसाठी वांगे भाकरीचा महाप्रसाद तयार केला जातो. अनेक दशकांपासून चालत आलेली ही प्रथा केवळ अन्नदान नसून गावाच्या एकोप्याचे आणि 'अतिथी देवो भव' संस्कृतीचे प्रतीक मानले जाते.

देवी बायजामातेची आख्यायिका राज्यात प्रसिद्ध आहे. जागृत देवस्थान म्हणून बायजामाता देवस्थान ओळखले जाते. यात्रोत्सवादरम्यान अनेक भक्त भाविक नवसपुर्तीसाठी तसेच नवस बोलण्यासाठी येत असतात. राज्याच्या कानाकोपऱ्यातून भक्त भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येत असल्याने यात्रा उत्सव समिती तसेच ग्रामस्थ येणाऱ्या भक्त भाविकांसाठी सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. यात्रा उत्सवाचा जास्तीत जास्त भक्त भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन समस्त ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

### भगत म्हणून म्हस्के तर पालखी मिरवणुकीचा मान पवार पाटलांना !

बायजामाता यात्रोत्सव हा केवळ धार्मिक सोहळा नसून गावच्या अस्मितेचा, परंपरेचा आणि सामूहिक ऐक्याचा उत्सव आहे. त्यामुळे अवघे जेऊर गाव सध्या भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले आहे. परंपरेने देवीचे भगत म्हणून म्हस्के कुटुंबीयांना तर पालखी मिरवणुकीचा मान पवार पाटलांना आहे. पालखीची मिरवणूक पवार पाटलांच्या ऐतिहासिक वाड्यातून निघत असते.

# अहिल्यानगरच्या भूमीत आरोग्यसेवेचा नवा अध्याय सुरु

## महाराष्ट्र दिनी शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा

**अहिल्यानगर** : महाराष्ट्र दिनी १ मे २०२६ रोजी नगर-मनमाड रोडवरील शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते, तसेच माजी खासदार सुजय विखे पाटील आणि आमदार संग्राम जगताप यांच्या अध्यक्षतेखाली सकाळी ११ वाजता संपन्न होत आहे. या कार्यक्रमास महापौर ज्योती गाडे, उपमहापौर धनंजय जाधव यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

उच्च दर्जाची, तज्ज्ञ व विश्वासार्ह वैद्यकीय सेवा समाजापर्यंत पोहोचविण्यासाठी शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या रूपाने अहिल्यानगरच्या भूमीत आरोग्य सेवेचा नवा अध्याय सुरू करीत आहेत. ७० बेडसह २० आयसीयु व ३ अत्याधुनिक ऑपरेशन थिएटरसह हॉस्पिटल रुग्णसेवेत दाखल होत आहे.

अस्थिरोग, मेडिसिन, सर्जरी, किडनी विकार, स्त्रीरोग आदी आरोग्य सेवा हॉस्पिटलच्या वतीने उपलब्ध असतील. शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आपल्या




नावाप्रमाणेच शाश्वत रुग्णसेवा देण्यासाठी सुरू होत आहे. रुग्णांना अत्याधुनिक व तत्पर सेवा देण्यासाठी विविध तज्ज्ञ डॉक्टर्स शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या रूपाने रुग्णांना अत्याधुनिक व तत्पर सेवा देण्यासाठी आरोग्य सेवेचा नवा अध्याय महाराष्ट्र दिनी सुरू करीत आहेत.

हॉस्पिटलमध्ये अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. दीपक कळमकर, फिजिशियन डॉ. प्रदीप कंठाळी, किडनी विकार तज्ज्ञ डॉ. आकाश बेरड, जनरल सर्जन डॉ. विश्वजीत पवार, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. योगिता दरेकर-पवार, स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. अपूर्वा माटे-कळमकर, भूलतज्ज्ञ डॉ. तेजल सागडे-कंठाळी, नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रतीक्षा सोळंके-बेरड, युरोलॉजिस्ट डॉ. दीपक गाडेकर, फिजिओथेरपिस्ट (भारतीय वायूसेना) डॉ. दामोधर कळमकर आदी डॉक्टरांची टीम रुग्णसेवा देण्यासाठी सज्ज आहे.

आधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी तज्ज्ञ डॉक्टरांची टीम, सर्वसमावेशक वैद्यकीय सुविधा, रुग्णकेंद्रीत सेवा या मुल्यांवर आधारित शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आरोग्यसेवेचे नवे विश्वासस्थान ठरेल. हॉस्पिटलमध्ये सांधेरोपण, मणक्यांच्या शस्त्रक्रिया, फ्रॅक्चर, विविध प्रकारचे अस्थिरोग, मधुमेह, उच्च रक्तदाब, किडनीचे आजार, किडनी स्टोन, मूत्र विकारांचे आजार, डायलिसिस, स्त्रियांचे विविध समस्या व आजार, याबरोबरच वंधत्व निदान आणि उपचार, तसेच पोटाचे व आतड्यांच्या विकारांसह स्त्री-पुरुषांच्या विविध आजारांवर शाश्वत व खात्रीशीर निदान करून उपचार केले जातील.

हॉस्पिटलमध्ये अतिदक्षता विभाग २४ तास कार्यरत असेल. याशिवाय २४ तास मेडिकल व म्ब्युलन्स सेवा उपलब्ध असेल. महाराष्ट्र दिनी रुग्णसेवेत रुजू होणाऱ्या शाश्वत मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या १ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता लोकार्पण सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे.

## द•ख•ल



### टाकाऊ वस्तूंमधून पक्षांसाठी शंभराहून अधिक घरटी तयार : डोळसे

**अहिल्यानगर-** हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात एक अनोखा निसर्ग उपयुक्त उपक्रम घेण्यात आला. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी शंभराहून अधिक पक्षांसाठी सुंदर घरटी तयार केली. सध्या ऊन, उष्णता भयंकर आहे. मनुष्याला या अति उष्णतेचा त्रास होतो आहे. आज प्राणी, पक्षी यांची अवस्था देखील खूपच बिकट आहे. पक्षी हा निसर्गाचा एक प्रमुख घटक असून मनुष्यासाठी तो अतिशय जवळचा आहे. शहरात वृक्षांची कमतरता असल्यामुळे पक्षांसाठी सध्याच्या वातावरणात आपल्या गच्चीवर, अंगणात पाण्याची व्यवस्था करणे, त्यांच्या राहण्यासाठी घरटी तयार करणे आज आवश्यक आहे. याचा विचार करून सीताराम सारडा विद्यालयात विद्यार्थ्यांना घरातील टाकाऊ वस्तूंपासून कलात्मकरीत्या पक्षांसाठी घरटी तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात विद्यार्थ्यांना कला शिक्षक तथा मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी ही घरटी तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखविले. विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमाला उत्तम प्रतिसाद देत शंभराहून अधिक सुंदर घरटी तयार केली. या घरट्यांमध्ये पक्षी सहज बसू शकेल, त्यासोबत पाण्याची व्यवस्था, खाण्यासाठी दाणे ठेवण्याची व्यवस्था देखील विद्यार्थ्यांनी अतिशय कलात्मकतेने केलेली आहे. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी पारितोषिके दिली.

### वनकुटे तास भागात अवैध माती उत्खननाचा धुमाकूळ; कारवाईची मागणी



**अहिल्यानगर** : पारनेर तालुक्यातील मौजे वनकुटे तास या आदिवासी बहुल भागात सुरू असलेल्या अवैध माती उत्खनन आणि वाहतुकीच्या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी तात्काळ पंचनामा करून संबंधितांवर दंडात्मक कारवाई करावी तसेच अवैध वाहतूक करणारी वाहने जप्त करावीत, अशी मागणी अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, वनकुटे तास हा मुळा नदीलगतचा विस्तीर्ण आदिवासी भाग असून येथील शेतकरी आता हळूहळू आधुनिक शेतीकडे वळत आहेत. मात्र, माती माफियांच्या मनमानी कारभारामुळे या शेतकऱ्यांच्या जमिनीवरून मोठ्या प्रमाणात अवैध माती उत्खनन केले जात आहे. ही माती पारनेर, अहिल्यानगर तसेच शिरूर तालुक्यातील विटभट्ट्यांसाठी बेकायदेशीररीत्या वाहतूक केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अवजड वाहतुकीमुळे परिसरातील प्रमुख रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर हानी झाली असून रस्ते खड्डेमय झाले आहेत. परिणामी, स्थानिक नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः आदिवासी समाजातील अनेक व्यक्तींना या वाहतुकीमुळे अपघातांना सामोरे जावे लागले असून, अनेक घटनांची अधिकृत नोंददेखील झालेली नाही, ही बाब चिंताजनक असल्याचे समितीने नमूद केले आहे.

### बनारस-हडपसर अमृत भारत एक्सप्रेसचे अहिल्यानगर येथे उत्साहात स्वागत

**अहिल्यानगर** : अहिल्यानगर येथे आज २२५८९/९० बनारसहडपसरबनारस अमृत भारत एक्सप्रेसच्या स्वागत व शुभारंभ कार्यक्रमाचा उत्साहपूर्ण, दिमाखदार आणि अभिमानास्पद समारंभ पार पडला. माननीय पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुरू झालेल्या या नव्या अमृत भारत एक्सप्रेस सेवेमुळे उत्तर भारत व महाराष्ट्र यांदरम्यानचा रेल्वे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित, आधुनिक आणि सुविधायुक्त होणार असून 'विकसित भारत'च्या दिशेने भारतीय रेल्वेने टाकलेले हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. या ऐतिहासिक प्रसंगी अहिल्यानगर रेल्वे स्थानकावर प्रवासी, नागरिक आणि रेल्वे प्रशासनाने मोठ्या उत्साहात नव्या अमृत भारत एक्सप्रेसचे स्वागत केले. संपूर्ण स्थानक परिसरात उत्साह, अभिमान आणि जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले. या स्वागत समारंभास श्री पद्मश्री उत्तम जाधव रेल प्रबंधक, श्री अशोक रामचंदानी मंडल कार्मिक अधिकारी, श्री शांतनु अत्रे सहायक वाणिज्य प्रबंधक, श्री सुधीर महाजन स्टेशन प्रबंधक, श्री शुभम थोरात मुख्य वाणिज्य निरीक्षक (उउख), आरपीएफचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस प्रशासनाचे अधिकारी, रेल्वे कर्मचारी तसेच मान्यवर नागरिक यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या प्रसंगी श्री सुदर्शन डी. डुंगरवाल, सदस्य झोनल रेल्वे युजर्स कन्सल्टेटिव्ह कमिटी (नठणउउ) यांनी प्रमुख मान्यवरांसमवेत व्यासपीठावर उपस्थित राहून स्वागत समारंभात मानाचा सहभाग नोंदविला. मान्यवर अतिथींसमवेत त्यांनी अमृत भारत एक्सप्रेसला हिरवा झेंडा दाखवत शुभारंभ सोहळ्यात सक्रिय सहभाग घेतला.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

शुक्रवार, दि.०१ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८


# नगरचे एस.पी सोमनाथ घार्गे यांची बदली !

## मुमुक्का सुदर्शन नगरचे नवे पोलीस अधीक्षक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : नगरचे एसपी सोमनाथ घार्गे यांची नुकतीच तडकाफडकी बदली करण्यात आली आहे. या घटनेमुळे प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. सोमनाथ घार्गे यांच्या जागी चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांची नव्याने नियुक्ती करण्यात आली आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले आहेत. त्यातच नगरचे एस. पी सोमनाथ घार्गे यांची बदली करण्यात आल्याने उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे. जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांची कारकीर्द चांगलीच गाजली. ते सुरुवातीला श्रीरामपूर येथे उपाधीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर त्यांना पुन्हा नगरच्या पोलीस अधीक्षक पदाची जबाबदारी देण्यात आली. श्रीरामपूर येथे कार्यरत असताना त्यांची कामगिरी चांगलीच गाजली होती.



दरम्यान मध्यंतरीच्या काळात नगर जिल्ह्यात अनेक शेअर मार्केटिंगच्या नावाखाली फसवणुकीच्या घटना घडल्या. ज्यादा परताव्याचे आमिष दाखवून अनेकांची करोडो रुपयांची फसवणूक करण्यात आली. यामध्ये शेवगाव तालुक्यात कवडे नावाच्या एजंटने अनेकांना गंडवले.

या संदर्भात शेवगाव पोलीस ठाण्यात वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. या गुन्ह्याच्या तपासात मोठी दिरंगाई झाली होती. या पोलीस तपासाबाबत नागरिकांमधून संशय व्यक्त केला जात होता. या घटनेने नागरिकांमधून मोठा संताप व्यक्त होत होता. त्याचप्रमाणे श्रीगोंदा तालुक्यातील अनेक फसव्या योजनांमुळे अनेकांना गंडविण्याच्या घटना घडल्या होत्या. याबाबतही वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत. दरम्यान कायदा व सुव्यवस्थेच्या कारणास्तव पोलीस दलात मोठे फेरबदल करण्यात आले. त्यातच नगरचे एसपी सोमनाथ घार्गे यांची बदली करण्यात आली असून त्यांच्या जागी चंद्रपूरचे पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुदर्शन यांनी चंद्रपूर जिल्ह्यात चांगले काम केले असून गुन्हेगारांचे कंबरडे मोडले आहे. गुन्हेगारांचा कर्दनकाळ अशी त्यांची ख्याती आहे. नगर जिल्ह्यात अशा खमक्या पोलीस अधिकाऱ्याची नियुक्ती झाल्यामुळे अवैध व्यावसायिकांचे धाबे दणाणले आहेत.

# न्यायालयात थुंकल्याने महिलेस दंड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : न्यायालयीन परिसरातील स्वच्छता अबाधित ठेवण्यासाठी श्रीरामपूर येथील जिल्हा न्यायालयाने कठोर पाऊल उचलले आहे. कोर्टाच्या भिंतीवर थुंकणाऱ्या एका महिला आरोपीस सत्र प्रकरणादरम्यान तब्बल १,२०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला. जिल्हा न्यायाधीश श्रीपाद देशपांडे यांनी ही कारवाई करताना न्यायालयीन परिसरातील शिस्त व स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड सहन केली जाणार नसल्याचे स्पष्ट केले. ही कारवाई केवळ दंडापुरती मर्यादित नसून, पुढील काळात अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी न्यायालयाचा इशारा असल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी न्यायाधीशांनी सांगितले की, मुख्य जिल्हा न्यायाधीश एस. एन. साळवे यांच्या निर्देशानुसार, न्यायालय व परिसरात घाण करणे, थुंकणे किंवा कचरा टाकणे यासारख्या प्रकारांवर अधिक कठोर कारवाई करण्यात येणार आहे. आवश्यकतेनुसार यापेक्षा अधिक कडक दंडात्मक उपाययोजना देखील केल्या जातील, असा इशाराही त्यांनी दिला. या निर्णयामुळे न्यायालयीन परिसरातील स्वच्छतेबाबत जागरूकता वाढण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, नागरिकांनी जबाबदारीची जाणीव ठेवून परिसर स्वच्छ राखावा, असे आवाहन न्यायालयाकडून करण्यात आले आहे.

# वांगी येथे अवैध वाळू उपशावर कारवाई

## ४ लाख २० हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील वांगी परिसरात सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई करत एक आरोपी ताब्यात घेतला असून सुमारे ४ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे अवैध वाळू माफियांमध्ये खळबळ उडाली आहे. अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी जिल्ह्यातील अवैध वाळू उपसा व वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले होते.

या पथकात पोलीस अंमलदार रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, रमीजराजा आत्तार व विशाल तनपुरे यांचा समावेश होता. दि. ३० एप्रिल २०२६ रोजी पथक श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे हद्दीत गस्त



घालत असताना गुप्त माहितीच्या आधारे वांगी गावाजवळील बिरोबा मंदिर परिसरात, प्रवरा नदी पात्रातून अवैध वाळू उपसा सुरू असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार पथकाने तत्काळ छापा टाकला. यावेळी दोन इसम टेम्पोमध्ये वाळू भरताना आढळून आले. पोलिसांची चाहूल लागताच एक जण घटनास्थळावरून पसार झाला, तर दुसऱ्या इसमाला ताब्यात घेण्यात आले.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव गोविंद काळू पवार (वय २१, रा. कारेगाव, ता. श्रीरामपूर) असे असून, संबंधित टेम्पो हा सनी लक्ष्मण बारसे (रा. कारेगाव, ता. श्रीरामपूर) याच्या मालकीचा आहे. बारसे हा सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे. या कारवाईत पोलिसांनी विनानंबरचा टाटा कंपनीचा टेम्पो (अंदाजे किंमत ४ लाख रुपये) तसेच सुमारे २० हजार रुपये किमतीची २ ब्रास वाळू असा एकूण ४ लाख २० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी रमीजराजा रफीक आत्तार यांच्या फिर्यादीवरून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १२८/२०२६ नोंदविण्यात आला असून भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास श्रीरामपूर तालुका पोलीस ठाणे करीत आहे.

# सासरवाडीच्या विकास कामांना प्राधान्य देऊ ’: आ. प्रसाद लाड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**तिसगाव / पाथर्डी** : तालुका माझी सासरवाडी आहे त्यामुळे निंबोडी असो अथवा तिसगाव या गावच्या विकास कामासाठी मंत्रालयापर्यंत पाठपुरावा करू विकास कामात कुठे कमी पडणार नाही शेवटी सासुरवारीच्या कामांना प्राधान्य द्यावाच लागेल अशा शब्दात महायुती सरकारचे समन्वयक आमदार प्रसाद लाड यांनी तिसगावच्या विकास कामांना गती देण्याचा शब्द तिसगावकरांना दिला आहे. तिसगावचे ज्येष्ठ नेते काशिनाथ पाटील लवांडे युवानेते कुशल भापसे राहुल कारखेले नंदकुमार लोखंडे प्रसाद देशमुख सिद्धिविनायक प्रतिष्ठानचे अध्यक्ष सोमनाथ कातखडे चेअरमन पुरुषोत्तम आठरे सुनील शिंगवी विक्रमराव ससाने शिक्षक बँकेचे संचालक कल्याण लवांडे शिक्षक नेते महेश लोखंडे बोरुडे सर युवानेते भाऊसाहेब लवांडे सचिन साळवे गीताराम वाघ दादासाहेब पाठक प्रणील सावंत पिंटू परमार देविदास माने अरुणदेवा पुंड संजय स्वामी यांच्यासह तिसगाव येथील अनेक प्रमुख मान्यवर पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. तिसगावचा पिण्याच्या पाण्याचा अथवा वांबोरी चारीचा पाण्याचा प्रश्न तसेच तिसगाव ते चिचोंडी या रस्त्याच्या दुरुस्तीचा प्रश्न देखील निश्चितपणे मार्गे लावला जाईल.



### सासरवाडीला शब्द दिलाय !

यावेळी आमदार प्रसाद लाड यांनी तिसगाव ते चिचोंडी रस्त्याच्या दुरुस्ती कामासाठी सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना फोन करून या रस्त्याच्या कामासाठी तात्काळ निधी देण्याचे विनंती केली मुख्यमंत्री सडक योजनेतून या रस्त्याला निधी देणार असल्याचे मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले यावेळी आमदार प्रसाद लाड म्हणाले सासरवाडीला शब्द दिलाय तेवढा पूर्ण करा.

जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून पाणी प्रश्न मार्गी लावला लावू तर तिसगाव ते चिचोंडी रस्त्याचा प्रश्न सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या माध्यमातून निश्चितपणे मार्गे लावला जाईल असा शब्द आमदार प्रसाद लाड यांनी यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिला.

# काष्टीच्या साई सेवा पतसंस्थेविरोधात तक्रार ठेवीदारांची फसवणूक : कारवाईची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : काष्टी येथील साई सेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या., काष्टी तसेच साई सेवा मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड यांच्या विरोधात ठेवीदारांनी गंभीर तक्रार दाखल केली आहे., ठेवी परत न मिळाल्यामुळे आर्थिक फसवणुकीचा आरोप करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित संस्थांनी आकर्षक व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर ठेवी स्वीकारल्या. मात्र, सध्या ठेवीदारांना त्यांची रक्कम परत मिळत नसल्याने संताप व्यक्त होत आहे. ठेवी परत दिल्या जात नसल्याची तक्रार असून, संचालक मंडळाकडून टाळाटाळ केली जात आहे तसेच काही संचालक फरार असल्याची चर्चा आहे.

संस्थेचे आर्थिक व्यवहार संशयास्पद व अनियमित असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. यामुळे अनेक ठेवीदार आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या प्रकरणी ठेवीदारांनी महाराष्ट्र राज्य सहकार आयुक्त व निबंधक, पुणे यांच्याकडे लेखी तक्रार देत संस्थेच्या कारभाराची तात्काळ चौकशी करण्यात यावी, संबंधित संचालकांवर कठोर फौजदारी कारवाई करावी, संस्थेवर प्रशासक नेमावा, संस्थेची व संचालकांची मालमत्ता जप्त करावी तसेच ठेवीदारांचे पैसे व्याजासह तातडीने परत मिळवून द्यावेत, अशी मागणी केली आहे. या तक्रारीची तातडीने दखल घेऊन योग्य ती कार्यवाही करण्याची असे तक्रारीत म्हटले आहे.

या मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास संबंधित कार्यालयासमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही ठेवीदारांनी दिला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून, अनेक कुटुंबांचे आर्थिक नुकसान झाल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ४०/४२ चा उन्हाचा पारा व वाहतात घामाच्या धारा लग्नसराईचा उत्साह मंदावला

## वऱ्हाडी त्रस्त सकाळ-सायंकाळी विवाहाला प्राधान्य



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : परिसरात सध्या लग्नसराईचा हंगाम सुरू असला तरी यंदाच्या कडाक्याच्या तीव्र उन्हामुळे या आनंदावर काहीसा विरजण पडल्याचे चित्र दिसून येत आहे. एप्रिलच्या अखेरीस तापमानाचा पारा तब्बल ४० ते ४२ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने विवाह सोहळ्यांमध्ये सहभागी होणाऱ्या पाहुण्यांना आणि वराडी मंडळींना प्रचंड उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

परिणामी, लग्नाचा उत्साह असूनही उष्णतेमुळे सर्वत्र अस्वस्थता जाणवत आहे. भर दुपारच्या उन्हात प्रवास करून येणाऱ्या वराड्यांची अवस्था विशेषतः बिकट होत आहे. लांबवरून येणाऱ्या पाहुण्यांना उष्माघाताचा धोका निर्माण होत असून, अनेकांना थकवा, डोकेदुखी व चक्कर येण्यासारख्या तक्रारी जाणवत आहेत. त्यामुळे विवाह सोहळ्यांमध्ये उपस्थितीवरही काही प्रमाणात परिणाम होत असल्याचे दिसून येते. मंगल कार्यालयांमध्ये कुलर, पंखे, एसी आणि थंड पाण्याची व्यवस्था केली जात असली तरी वाढत्या तापमानासमोर ही साधने अपुरी पडत आहेत.

### थंड पेयांना वाढती मागणी

कडाक्याच्या उन्हामुळे लग्नसोहळ्यांमध्ये मठ्ठा, लिंबूपाणी, कोकम सरबत, ज्यूस आणि आईस्क्रीम यांची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. उष्णतेपासून दिलासा मिळवण्यासाठी पाहुणे वारंवार या पेयांकडे वळत असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी मिनरल वॉटर, थंड पाण्याचे टँकर आणि आईस क्यूब्सची विशेष व्यवस्था केली जात आहे. एकूणच, यंदाच्या उष्णतेच्या लाटेमुळे लग्नसराईचा आनंद काहीसा कमी झाल्याचे चित्र असले तरी योग्य नियोजन, वेळेतील बदल आणि सुविधा वाढवून या अडचणींवर मात करण्याचा प्रयत्न वधू-वर पक्षाकडून केला जात आहे.

हॉलमध्ये वाढती गर्दी आणि बाहेरील उष्ण वाऱ्यामुळे कुलरमधूनही गरम हवा येत असल्याच्या तक्रारी पाहुण्यांकडून केल्या जात आहेत. परिणामी, अनेक पाहुणे हॉलमध्ये थांबण्याऐवजी बाहेर झाडांच्या सावलीत किंवा मोकळ्या जागेत आसरा घेताना दिसतात. याचा थेट परिणाम विवाह सोहळ्याच्या व्यवस्थापनावर होत आहे. उन्हाची तीव्रता लक्षात घेता अनेक कुटुंबांनी लग्नाच्या वेळांमध्ये बदल करण्यास सुरुवात केली आहे. पारंपरिक दुपारच्या मुहूर्ताऐवजी सकाळी लवकर किंवा सायंकाळी उशिरा विवाह उरकण्याकडे कल वाढला आहे. यामुळे पाहुण्यांना दिलासा मिळत असला तरी मर्यादित मुहूर्तांमुळे अनेकांना अजूनही भर दुपारीच विवाह पार पाडावे लागत आहेत. दरम्यान, उष्णतेमुळे विवाह सोहळ्यांतील खाद्यपदार्थांच्या पसंतीतही बदल झाला आहे.

पारंपरिक गरम पदार्थांपेक्षा मठ्ठा, लिंबूपाणी, ताक, फळांचे ज्यूस आणि आईस्क्रीम यांसारख्या थंड पदार्थांना अधिक मागणी वाढली आहे. अनेक ठिकाणी खास ‘कूलिंग काउंटर’ उभारून पाहुण्यांना थंड पेयांची व्यवस्था करण्यात येत आहे.

# खैरी निमगांव येथील तरुण बेपत्ता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खैरी निमगांव येथील मोहन रामदास शिरसाठ (वय ३४) हा तरूण रागाच्या भरात कोणास काही एक न सांगता घरून निघुन गेला तो अद्यापपर्यंत घरी परतलेला नसुन कुटूंबीयांसह मित्रपरीवाराकडून शोधाशोध घेतला. मात्र तरी देखील तो कोठेही मिळून न आल्याने तालुका पोलिसांत मिसिंग नोंद करण्यात आली आहे. बेपत्ता मोहन शिरसाठ यांचा रंग सावळा, उंची पाच फूट सहा इंच, नाक सरळ, शरीराने सडपातळ, डोळे तरतरीत, हातावर गोंधलेले, अंगात हिरव्या रंगाचा टि शर्ट, निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट परीधान केलेला असुन वरील वर्णनाच्या युवकाबाबत काही माहिती मिळाल्यास श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात संपर्क करून माहिती देण्याचे आवाहन पोलिसांकडून केले आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात त्याची आई मंगल रामदास शिरसाठ यांनी तक्रार केली असून पोलिसांनी मिसिंग नोंद करण्यात आली आहे.

# महावितरण विरोधात ठेकेदारांचे कामबंद आंदोलन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : विविध पाठपुरावा करूनही कोणतीही कार्यवाही न झाल्याने महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनच्या वतीने २७ एप्रिल पासून श्रीरामपूर विभागातील ठेकेदारांनी सर्व प्रकारची देखभाल-दुरुस्तीची कामे बंद केली आहेत. या आंदोलनामुळे ऐन उन्हाळ्यात बीज पुरवठा खंडित झाल्यास तो सुरळीत करण्यासाठी यंत्रणा उपलब्ध नसेल, परिणामी संपूर्ण विभाग अंधारात जाण्याची भीती व्यक्त होत आहे असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, गेल्या अनेक महिन्यांपासून ठेकेदारांची विविध कामांची बिले प्रलंबित आहेत. याबाबत वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासनाकडून दाद मिळत नसल्याने ठेकेदार आर्थिक संकटात सापडले आहेत. . त्यातच, महावितरणने कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय किंवा प्रशिक्षणाशिवाय ऑटो रॉंचीन ही नवीन प्रणाली लागू केली आहे. या प्रणालीमध्ये कामाचे वाटप, बिलिंग आणि पेमेंट सायकलबाबत कोणतीही स्पष्टता नसल्याने ठेकेदारांमध्ये कमालीचा संभ्रम आहे. ठेकेदारांनी पुकारलेल्या आंदोलनामुळे २७ एप्रिल पासून संभाव्य बिघाड रोखण्यासाठी केली जाणारी प्रतिबंधात्मक कामे, अचानक झालेला बिघाड दुरुस्त करणे, उच्च आणि लघु दाबाच्या वाहिन्यांसह रोहित्रांच्या दुरुस्तीची कामे पूर्णपणे बंद राहतील, असे असोसिएशनच्यावतीने सांगण्यात आले आहे. सध्या तीव्र उन्हाळ्यामुळे बिजेची मागणी बाढलेली आहे. अशा स्थितीत लाईनमध्ये बिघाड झाल्यास किंवा रोहित्र जळाल्यास दुरुस्तीसाठी अनुभवी मनुष्यबळ उपलब्ध नसेल. परिणामी, वीज पुरवठा पूर्ववत होण्यास विलंब लागून सामान्य नागरिकांना आणि शेतकऱ्यांना मोठा फटका बसू शकतो. ग्राहकांचा हा रोष महावितरणला महागात पडण्याची शक्यता आहे.


१ म महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

Godavari Biorefineries Ltd

Somaiya GROUP

GODAVARI BIOREFINERIES LTD.

We are a Biorefining company producing sugar, chemicals and waxes

Register Office

Somaiya Bhawan, 45-47, MG Road, Post box no. 384,
Fort, Mumbai-400023 Ph. no.022-22048272&, 22858430

Factory

1. Po, Sakarwadi-423, Tal-Kopargaon, Dist-Ahmednagar (M.S.)
2. Sameerwadi (via Mahalingpur), Dist. Bagalkot, Karnataka

तमाम जनतेस महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

महाराष्ट्र पोलीस — सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

पो.हे.कॉ. सरोदे
पो. कॉ. काळाणे
पो. कॉ. शेख

पोलीस दुरक्षेत्र नान्नज ता. जामखेड

तमाम जनतेस महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

श्री नंदादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय नान्नज ता. जामखेड जि अहिल्यानगर
प्राचार्य :- रेपाळे सर व सर्व शिक्षक स्टाफ

तमाम जनतेस महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

ग्रामपंचायत कार्यालय नान्नज
सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, सर्व सदस्य व कर्मचारी वृंद नान्नज
ता. जामखेड जि अहिल्यानगर

तमाम जनतेस महाराष्ट्र दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

जिल्हा परिषद प्रा.शाळा महादेवगल्ली जामखेड
मुख्याध्यापक : विकास बगाडे व सर्व शिक्षक वृंद
ता. जामखेड जि अहिल्यानगर